# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १६६) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी–०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.२८ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## फोडाफोडीच्या राजकारणामुळे लोकशाही धोक्यात, जनता वैतागली–विजय वडेट्टीवार

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)– ''महाराष्ट्रातील फोडाफोडीच्या घाणेरड्या राजकारणाला राज्यातील जनता आता पूर्णपणे वैतागली असून लोकांमध्ये या लोकप्रतिनिधींबद्दल प्रचंड राग आहे. जर कुणाला पक्ष सोडायचाच असेल, तर त्यांनी आधी आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे आणि मगच दुसऱ्या पक्षात गेले पाहिजे,'' अशा शब्दांत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी बंडखोरांवर हल्ला चढवला आहे. सध्या देशात लोकशाही पूर्णपणे धोक्यात आली असली, तरी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष या संकटातून पुन्हा एकदा जोमाने उभारी घेईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. विजय वड्डेटीवार म्हणाले, राज्यातील जनतेमध्ये फोडाफोडीच्या राजकारणाविरोधात प्रचंड नाराजी आहे. लोकप्रतिनिधींनी जनतेच्या मतांचा आदर ठेवत पक्षांतर करायचे असल्यास प्रथम आपल्या पदाचा राजीनामा देऊन पुन्हा जनतेचा कौल घ्यावा. राज्यात सुरू असलेल्या राजकीय घडामोडींमुळे लोकशाही धोक्यात आल्याचे सांगत वड्डेटीवार यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली. अशा प्रकारच्या राजकारणामुळे जनतेचा लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास कमी होत असल्याचे त्यांनी म्हटले. शिवसेनेतील पक्षांतरांच्या पार्श्वभूमीवर बोलताना उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पुन्हा उभारी घेईल, असा विश्वास वड्डेटीवार यांनी व्यक्त केला.

# महाराष्ट्र टीईटी परीक्षा पेपरफुटी प्रकरणी तीन आरोपी ताब्यात

## दीड कोटी रुपयांत विकला जाणार होता पेपर; अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक दुधे यांची माहिती

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)– महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत २८ जून रोजी होणारी शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ प्रश्नपत्रिका फुटल्याच्या संशयावरून पुढे ढकलण्यात आल्यानंतर या प्रकरणात मोठी माहिती समोर आली आहे. टीईटी परीक्षेचा पेपर तब्बल दीड कोटी रुपयांना विकला जाणार होता, अशी धक्कादायक माहिती अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक दुधे यांनी भिवंडी येथे पत्रकार परिषदेत दिली. या प्रकरणी तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना भिवंडीतील कोनगाव परिसरातून ताब्यात घेण्यात आले आहे.



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने जारी केलेल्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकानुसार, उद्या २८ जून रोजी राज्यभर एकूण १,०२८ परीक्षा केंद्रांवर टीईटी परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आले होते. नुकत्याच देशभर गाजलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणानंतर परिषदेने सुरक्षेच्या दृष्टीने विशेष उपाययोजना केल्याचा दावा केला होता. मात्र, परीक्षा होण्याच्या काही तासांपूर्वीच मिळालेल्या गोपनीय माहितीमुळे संपूर्ण यंत्रणा सतर्क झाली. याची माहिती देण्यासाठी भिवंडी येथे अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक दुधे यांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली आहे.

अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक दुधे यांनी सांगितले की, ताब्यात घेण्यात आलेल्या तीन आरोपींपैकी एक आरोपी हरियाणाचा तर दोन आरोपी बिहारचे रहिवासी आहेत. हे तिघेही दिल्लीहून महाराष्ट्रात आले होते. प्राथमिक तपासात त्यांनी टीईटीची प्रश्नपत्रिका विक्रीसाठी आणल्याचे समोर आले असून, त्यासाठी दीड कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. मात्र हा व्यवहार पूर्ण होण्यापूर्वीच पोलिसांनी कारवाई करत आरोपींना जेरबंद केले. या कारवाईदरम्यान संशयितांकडून प्रश्नपत्रिकेशी संबंधित कागदपत्रे आणि साहित्य जप्त करण्यात आले आहे. प्रश्नपत्रिका नेमकी कुठून मिळाली, ती कोणाकडून आरोपींपर्यंत पोहोचली आणि ती नेमकी कोणाला विकली जाणार होती, याचा सध्या सखोल तपास सुरू असल्याचे दुधे यांनी सांगितले.

या प्रकरणाचा तपास करण्यासाठी २० पोलिस कर्मचाऱ्यांचे विशेष तपास पथक नियुक्त करण्यात आले असून, विविध राज्यांमध्ये तपासासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू (पान ४ वर)

### पेपरफुटी प्रकरणी सह पोलीस आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी गठित करण्याचे मुख्यमंत्र्याचे आदेश

टीईटी परीक्षेचा पेपर फुटल्याच्या घटनेनंतर याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला आहे. ठाण्याचे सह पोलीस आयुक्त पंजाबराव उगले यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी गठित करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. टीईटी पेपर फुटी प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्वाचे आदेश दिले आहेत. ठाण्याचे जॉईंट सीपी पंजाबराव उगले यांच्या अध्यक्षतेत एसआयटी गठित करण्याचे आदेश दिले आहेत. टीईटीप्रकरणी सरकार अॅक्शन मोडवर आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस महासंचालक यांना फोन करुन आदेश दिले आहेत. दोषींवर कठोर कारवाई करा. कुणाचीही गय करु नका असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. तसेच दादा भुसे यांनाही मुख्यमंत्र्यांनी फोन केला आहे.

## परीक्षा पारदर्शक होण्याच्या पार्श्वभूमीवर शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२६ पुढे ढकलण्याचा निर्णय

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)– महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी राज्यभरातील १,०२८ केंद्रांवर आयोजित करण्यात येणारी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२६ पुढे ढकलण्यात आली असल्याचे परीक्षा परिषदेमार्फत कळविण्यात आले आहे. परीक्षा पारदर्शकत होण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत टीईटी परीक्षा सुरक्षित व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या होत्या. तथापि, दि. २७ जून २०२६ रोजी पहाटे मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार भिवंडी येथे काही व्यक्तींना टीईटी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेबाबत माहिती असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. त्यानुसार भिवंडी पोलिसांनी संबंधित ठिकाणी धाड टाकून तपासणी केली.

या प्रकरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांना तातडीने घटनास्थळी बोलावून पडताळणी करण्यात आली. तपासादरम्यान संबंधित व्यक्तींकडे आढळलेल्या काही प्रश्न आणि शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) जून २०२६ च्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न समान असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी भिवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेची गंभीर दखल घेत परीक्षा पूर्णपणे पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने पार पडावी, तसेच संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याने दि. २८ जून २०२६ रोजी नियोजित टीईटी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून घेण्यात आला आहे. टीईटी परीक्षेच्या नव्या तारखेसह इतर अद्ययावत माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे परिषदेकडून कळविण्यात आले आहे.

## भ्रष्टाचार करता यावा म्हणूनच परीक्षा व्यवस्था सुधारली जात नाही; पेपरफुटीवर आ.सत्यजीत तांबेंचा गंभीर आरोप

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)– महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचा पेपर फुटल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी आ.सत्यजीत तांबे यांनी सरकारवर गंभीर आरोप केले आहे. यंत्रणेतील भ्रष्टाचारावर थेट बोट ठेवत आमदार सत्यजीत तांबे यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले की, ''कधी एमपीएससी कधी नीट आता टीईटी ! विभागातील भ्रष्टाचार हेच पेपर फुटीचे मुख्य कारण आहे. ठाण्यात टीईटी परीक्षेचा पेपर फ टल्याने उद्या होणारी परीक्षा रद्द करावी लागली. या परीक्षेला यंदा ४ लाख २८ हजारांहून अधिक उमेदवार बसणार होते. काही दिवसांपूर्वी नीट, सीबीएसई मूल्यांकनातील गोंधळ, युजीसी–नेट आणि विविध प्रवेश व भरती परीक्षांमधील अनियमितता यामुळे प्रत्येक वेळी लाखो विद्यार्थ्यांची मेहनत, वेळ आणि पैसा वाया जातो आणि यामुळे येणारी उदासीनता आणि मानसिक नैराश्य तर वेगळंच.

टीईटीची केस थोडी वेगळी आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार सेवेत राहण्यासाठी नोकरी असलेल्याही सर्व शिक्षकांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. त्यामुळे २०–३० वर्षे सेवा केलेले शिक्षकही जे आपल्या सेवापूर्तीच्या अंतिम टप्प्यात आहे त्यांना सुद्धा आपली नोकरी वाचवण्यासाठी ही परीक्षा पास होणे अनिवार्य आहे. त्यामुळे ही परीक्षा पास करण्यासाठी रात्रंदिवस अभ्यास करणाऱ्या लाखो प्रामाणिक विद्यार्थी आणि शिक्षक बांधवांच्या स्वप्नांवर एकप्रकारे घाला घालण्याचंच पापच या व्यवस्थेने केले आहे.

आता देशाला स्वातंत्र्य मिळून लवकरच जवळपास ८० वर्षे होतील. जग आयर्टीफीशियल इंटेलिजन्स आणि सायबर सुरक्षेच्या युगात पोहोचलं आहे. पण आपण अजूनही पारदर्शक आणि सुरक्षित परीक्षा व्यवस्था उभी करू शकलो नाही, यापेक्षा मोठे दुर्दैव ते काय? आजही आपण एमपीएससीचे निकाल वेळेवर देऊ शकत नाही, परीक्षा कधी ऑनलाइन तर कधी ऑफलाइन घेतो. या सर्वच विषयांवर मी परवाच विधिमंडळात आवाज उठवत याकडे सरकारचे लक्ष वेधले होते. (पान ४ वर)

### 'टीईटी' पेपरफुटीवरुन तीव्र संताप!, अभाविपचे तीव्र आंदोलन

पुणे दि.२७ (प्रतिनिधी)– राज्यात रविवारी ( २८ जून ) प्रस्तावित शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटीमुळे पुढे ढकलावी लागली आहे. या पेपरफुटीमुळे शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातून राज्य सरकारवर टीका करण्यात येत असून, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेनेही घरचा आहेर दिला.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) परीक्षा परिषदेच्या कार्यालयासमोर शनिवारी आंदोलन करून पेपरफुटीचा निषेध केला. 'पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर परीक्षा पुढे ढकलावी लागणे ही अत्यंत (पान ४ वर)

## पेपरफुटी सरकारची ओळख बनली–हर्षवर्धन सपकाळ

### टीईटी पेपरफुटीवरून काँग्रेस आक्रमक, दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

नागपूर दि.२७ (प्रतिनिधी)– टीईटी परीक्षेचा पेपर परीक्षेपूर्वीच फुटल्याचा दावा समोर आल्यानंतर राज्यातील परीक्षा व्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारवर जोरदार टीका करत निष्पक्ष चौकशीची मागणी केली असून, दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सामाजिक माध्यमावरील पोस्टद्वारे राज्य सरकारवर निशाणा साधला. ''पेपरफुटी हा आता अपवाद राहिलेला नाही, तर या सरकारची ओळख बनली आहे, असा आरोप त्यांनी केला. रविवारी होणाऱ्या शिक्षक पात्रता (टीईटी) परीक्षेचा पेपर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यातून फ टल्याच्या बातम्या समोर आल्याचा दावा करत, लाखो विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर आणि भविष्यावर पाणी फेरणाऱ्या रॅकेटला नेमके राजकीय संरक्षण कोणाचे आहे, असा सवाल त्यांनी एक्स वर उपस्थित केला.

नीट परीक्षेच्या पेपरफुटीनंतर देशभरात निर्माण झालेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर टीईटी परीक्षेबाबतही गंभीर आरोप समोर आले आहेत. परीक्षेच्या आदल्या दिवशीच प्रश्नपत्रिका व्हॉट्सअॅपवर व्हायरल झाल्याची माहिती समोर आल्याने परीक्षा रद्द होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणामुळे परीक्षा प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यापूर्वीही टीईटी परीक्षेदरम्यान गैरप्रकारांचे आरोप झाले असून, अनेकांवर (पान ४ वर)

## विलास घुले मृत्यू खून प्रकरणी सौरव सोनवणेंची एसआयटीकडून चार तास चौकशी

बीड दि.२७ (प्रतिनिधी)– हॉटेल चालक विलास घुले खून प्रकरणी खासदार बजरंग सोनवणे यांच्या मुलाची एसआयटी कडून तब्बल चार तास चौकशी करण्यात आली आहे. सकाळी साडेअकरा वाजता चौकशीसाठी सौरव सोनवणे उपविभागीय अधिकारी कार्यालयात दाखल झाले होते. चार तास चौकशी करण्यात आल्यानंतर सौरव सोनवणे हे उपविभागीय अधिकारी कार्यालयातून बाहेर पडले आहेत. या चौकशीनंतर एसआयटी प्रमुख आयपीएस व्यंकटराम यांनी माहिती दिली आहे. ते नेमकं काय म्हणालेत या संदर्भातील माहिती पाहुयात.

विलास घुले खून प्रकरणी शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे यांचे पुत्र सौरव सोनवणे यांची एसआयटी कडून चार तास चौकशी करण्यात आली. यानंतर एसआयटी प्रमुख आयपीएस व्यंकटराम यांनी माध्यमांशी संवाद साधला. पुराव्याच्या आधारे संपूर्ण तपास सुरु आहे. हत्येसाठी वापरलेले साहित्य, चाकू सगळं जप्त केलं आहे. सौरव सोनवणे यांना आम्ही कालच हजर राहण्यासंदर्भात नोटीस दिली होती, यानंतर हजर झाले. आमच्या (पान ४ वर)

## गद्दारांना जनताच गाडणार; उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल

### संजय देशमुख यांना निवडून देणाऱ्या मतदारांची मागितली माफी

यवतमाळ दि.२७ (प्रतिनिधी)– ज्या माणसाला आपण रक्ताचं पाणी करून खासदार बनवलं, त्याने या मातीशी आणि स्वतःच्या रक्ताशी गद्दारी केली! गद्दार अखेर गद्दारांच्याच कळपात गेला, अशा शब्दांत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी यवतमाळच्या 'निष्ठेची वज्रमूठ' मेळाव्यात पक्षांतर करणारे खासदार संजय देशमुख आणि शिंदे सरकारवर थेट हल्ला चढवला.

खासदार संजय देशमुख यांच्या पक्षांतरानंतर यवतमाळ येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात झालेल्या आज शनिवारी झालेल्या या पहिल्याच जाहीर सभेत उद्धव ठाकरेंची तोफ भाजप आणि गद्दारांवर धडाडली.



यवतमाळ जिल्हा हा शिवसेनेचा पारंपरिक बालेकिल्ला राहिला आहे. हाच बालेकिल्ला अधिक मजबूत करण्यासाठी आणि गद्दारांना आव्हान देण्यासाठी हा मेळावा असल्याचे आयोजकांनी यावेळी सांगितले. मेळाव्याला शिवसैनिकांची गर्दी झाली होती. मंचावर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत, सुभाष देसाई, अरविंद सावंत, विनायक राऊत, अनिल देसाई. आमदार संजय देरकर, यवतमाळचे संपर्क प्रमुख राजेंद्र गायकवाड, जिल्हा प्रमुख प्रवीण शिंदे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

आपल्या आक्रमक भाषणात उद्धव ठाकरेंनी थेट मतदारांची माफी मागून विषयाला हात घातला. ते म्हणाले, माझ्या सांगण्यावरून तुम्ही केवळ शिवसेना प्रमुखांचा चेहरा आणि माझा शब्द या विश्वासावर या माणसाला निवडून दिलं होतं. पण त्याने गद्दारी करून मतदारांच्या पाठीत खंजीर (पान ४ वर)

## महाराष्ट्रात पुढील ४८ तास महत्त्वाचे, पुणे, कोकणसह अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट

पुणे दि.२७ (प्रतिनिधी)– दोन दिवस विश्रांती घेतल्यानंतर राज्यात मान्सून पुन्हा एकदा रौद्र रूप धारण करणार आहे. हवामान विभागाने मुंबई, ठाणे आणि पुण्यासहित राज्यातील २४ जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. शनिवार आणि रविवारी (२७ व २८ जून) कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पावसाचा जोर सर्वाधिक असेल, असा अंदाज वर्तवून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गेल्या दोन दिवसांपासून मुंबई आणि पुण्यात पावसाने काहीशी विश्रांती घेतली असून ढगाळ वातावरणामुळे तापमानात वाढ नोंदवण्यात आली होती. मात्र, रविवारपासून मान्सून पुन्हा सक्रिय होणार असून पुण्यासह रायगड, रत्नागिरी आणि अहिल्यानगरमध्ये जोरदार पाऊस हजेरी लावेल. तर मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह वादळी पावसाची दाट शक्यता आहे.

मान्सून स्थिरावत असतानाच पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील जारकरवाडी (पान ४ वर)

## डोनाल्ड ट्रम्प २०२७ च्या सुरुवातीला भारत दौऱ्यावर येणार

वॉशिंग्टन दि.२७ (वृत्तसंस्था)– अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प २०२७ च्या सुरुवातीला भारताचा दौरा करणार आहेत, अशी माहिती भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी आयएएनएस या वृत्तसंस्थेला दिलेल्या विशेष मुलाखतीत दिली आहे. दोन्ही देश दीर्घकाळापासून प्रलंबित असलेला व्यापारी करार अंतिम करण्यासाठी आणि ऊर्जा, संरक्षण तसेच तंत्रज्ञान क्षेत्रातील संबंध अधिक दृढ करण्यासाठी प्रयत्नशील असतानाच या दौऱ्याचं नियोजन समोर आलं आहे.

भारताकडून होणाऱ्या आयातीवर अमेरिकेने ५० टक्क्यांहून अधिक शुल्क लादल्यामुळे दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले होते. त्यानंतर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा हा पहिलाच भारत दौरा असेल. सर्जिओ गोर हे भारतात गेल्या सहा महिन्यांपासून दौऱ्यावर होते. ते नुकतेच मायदेशी परतले. त्यावेळी ते म्हणाले की, राष्ट्राध्यक्षांच्या या दौऱ्याची तयारी आधीच सुरू झाली आहे. ट्रम्प आणि मोदी यांचे संबंध हे दोन्ही देश एकत्र मिळून जे काही उभारत आहेत त्याचा मुख्य पाया आहे, असेही ते म्हणाले. वॉशिंग्टन आपल्या सर्वात महत्त्वपूर्ण भागीदारींपैकी एक असलेल्या या संबंधांना अधिक मजबूत करण्यासाठी पावले उचलत असताना, परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ देखील या द्विपक्षीय अजेंड्याला पुढे नेण्यात गुंतलेले आहेत, असं गोर यांनी सूचित केलं.

''मी राष्ट्राध्यक्षांच्या दौऱ्याला अंतिम रूप देण्यासाठी भारतात जाणार आहे'', असं गोर यांनी आयएएनएसला सांगत ट्रम्प यांच्या भारत दौऱ्याचे राजनैतिक पातळीवर सक्रियपणे नियोजन सुरू असल्याचं स्पष्ट केलं. फ्रान्समधील जी–७ (७) शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात झालेल्या सौहार्दपूर्ण आणि व्यापक बैठकीच्या काही आठवड्यांनंतर ही घोषणा झाली आहे.

## २० वर्षीय सियाला लग्नासाठी हवी होती अजून तीन वर्षे; केतन अगरवाल हत्याप्रकरणी समोर आली धक्कादायक माहिती

पुणे दि.२७ (प्रतिनिधी)– पुण्यातील केतन अगरवाल हत्या प्रकरणातील अनेकविध धक्कादायक खुलासे तपासातून समोर येत आहेत. लोणावळा येथील लोहगड येथे केतनच्या होणाऱ्या पत्नीनेच त्याची दरीत ढकलून हत्या केली. या धक्कादायक घटनेमुळे महाराष्ट्रभर खळबळ माजली. दरम्यान, आता या प्रकरणातील महत्त्वाची माहिती समोर आली आहे. या हत्येमागे कोणताही हेतू सूड, पैसा किंवा कौटुंबिक वैर नसून सियाला हवा असलेला वेळ मिळवणे हा आहे. इंडिया टुडेने तपास अधिकाऱ्यांच्या हवाल्याने याबाबतचं वृत्त दिलं आहे.

तपास अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सियाने पोलिसांना सांगितलं की, तिला केतनबरोबर लग्न करायचं नव्हतं. केतनची हत्या केल्यास तिला लग्नाचा विचार करण्यास किमान आणखी तीन वर्षे मिळतील, असा तिचा समज होता. तसंच, सियाचा प्रियकर आणि याप्रकरणातील सहआरोपी चेतन चौधरी यालाही सियाबरोबर लग्न करण्यासाठी आणखी दोन ते तीन वर्ष वेळ हवा होता, असा पोलिसांचा संशय आहे. त्यामुळे हे लग्न मोडून समाजात बदनामी करण्यापेक्षा केतनची हत्या करणं त्यांना योग्य वाटलं, असं तपास अधिकाऱ्यांनी नोंदवलं.

### डिलीट केलेले चॅट्स ठरणार महत्त्वाचे

दोन्ही आरोपींनी आपल्या मोबाईलमधील संभाषणे पुसून टाकल्याचं समोर आल्यानंतर आता तपासाचा रोख डिजिटल पुराव्यांकडे वळला आहे. व्हॉट्सअॅप चॅट्स, इन्स्टाग्राम मेसेजेस आणि इतर डिलिट केलेले रेकॉर्ड्स सध्या फॉरेन्सिक तज्ज्ञांकडून तपासले जात आहेत. आरोपींनी गुन्ह्यापूर्वी आणि गुन्ह्यानंतर चॅट्स डिलीट केले, रिसायकल बिन रिकामे केले आणि प्रत्येक डिजिटल पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. हत्येपूर्वीचा नेमका घटनाक्रम शोधण्यासाठी पोलीस आता हा डेटा रिकव्हर करण्याचा प्रयत्न करत आहेत.

### सियाच्या भावाची १० तास चौकशी

या तपासाचा एक भाग म्हणून पोलिसांनी शुक्रवारी सियाचा भाऊ साहिल गोयल याची सुमारे १० तास चौकशी केली. साहिलची चेतन चौधरीसोबत असलेली ओळख आणि या प्रकरणाशी संबंधित इतर बाजूंबाबत त्याची चौकशी करण्यात आली, त्यानंतर त्याला सोडून देण्यात आले. केतन अगरवालच्या हत्येचा हा कथित पूर्वनियोजित कट पूर्णपणे उलगडण्यासाठी पोलीस आता सियाच्या कुटुंबातील इतर सदस्यांचेही जबाब नोंदवणार आहेत.

तपासातून असंही समोर आलं की साखरपुड्याच्या काही आठवड्यांपूर्वीच चेतन आणि सिया राजस्थानला गेले होते. तिथे ते पाच दिवस राहिले. चेतन हा (पान ४ वर)

# सुरक्षित अन्नातून आरोग्यपूर्ण जीवन

**मानवी** जीवनाच्या अस्तित्वासाठी अन्न ही सर्वात मूलभूत गरज आहे. अन्नाशिवाय जीवनाची कल्पनाही करता येत नाही. परंतु केवळ अन्न उपलब्ध असणे पुरेसे नाही, तर ते अन्न सुरक्षित, स्वच्छ, पौष्टिक आणि मानवी आरोग्यासाठी हितकारक असणे अत्यंत आवश्यक आहे. आधुनिक युगात अन्न उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक आणि वितरणामध्ये प्रचंड वाढ झाली आहे. जागतिकीकरणामुळे अन्न एका देशातून दुसऱ्या देशात सहज पोहोचू लागले आहे. या प्रगतीमुळे अन्नाची उपलब्धता वाढली असली तरी त्याचबरोबर अन्न सुरक्षेच्या समस्या देखील अधिक गंभीर झाल्या आहेत. रासायनिक भेसळ, कीटकनाशकांचे अवशेष, अस्वच्छ हाताळणी, अयोग्य साठवणूक आणि अन्नजन्य आजारांचे वाढते प्रमाण यामुळे मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. या पार्श्वभूमीवर जगभरात अन्न सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी आणि सुरक्षित अन्नाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी ७ जून रोजी 'जागतिक अन्न सुरक्षा दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिकता नसून सुरक्षित अन्न हा प्रत्येक मानवाचा मूलभूत हक्क आहे, ही जाणीव करून देणारी एक व्यापक जागतिक चळवळ आहे.

जागतिक अन्न सुरक्षा दिनाची सुरुवात संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकारातून झाली. डिसेंबर २०१८ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने ७ जून हा दिवस 'जागतिक अन्न सुरक्षा दिन' म्हणून घोषित केला आणि २०१९ पासून तो जगभर साजरा केला जाऊ लागला. या उपक्रमामध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची अन्न व कृषी संघटना आणि जागतिक आरोग्य संघटना या दोन प्रमुख संस्था महत्त्वाची भूमिका बजावतात. या संस्थांचा उद्देश अन्नजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, सुरक्षित अन्नाबाबत जागरूकता वाढवणे, अन्न साखळीतील सर्व घटकांची जबाबदारी निश्चित करणे आणि जागतिक सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करणे हा आहे. दरवर्षी या दिनासाठी एक विशिष्ट संकल्पना ठरवली जाते आणि त्या अनुषंगाने शैक्षणिक संस्था, सरकारी यंत्रणा, अन्न उद्योग आणि सामाजिक संस्था विविध उपक्रम राबवतात.

अन्न सुरक्षा म्हणजे अन्नामध्ये कोणतेही हानिकारक जैविक, रासायनिक किंवा भौतिक घटक नसणे आणि ते मानवी सेवनासाठी पूर्णपणे सुरक्षित असणे. अन्नामध्ये सूक्ष्मजीव जसे की बॅक्टेरिया, विषाणू, बुरशी आणि परजीवी असू शकतात. त्याचप्रमाणे कीटकनाशकांचे अवशेष, जड धातू, कृत्रिम रंग, रासायनिक स्वाद आणि इतर विषारी पदार्थही अन्न दूषित करू शकतात. काही वेळा अन्नामध्ये काच, प्लास्टिक किंवा धातूचे तुकडे यांसारखे परकीय घटकही आढळतात, जे थेट आरोग्यास इजा करू शकतात. अशा दूषित अन्नामुळे अन्नविषबाधा, अतिसार, उलट्या, ताप, यकृताचे विकार, मूत्रपिंडाचे आजार आणि गंभीर संसर्गजन्य आजार उद्भवू शकतात. दीर्घकाळ दूषित अन्नाचे सेवन केल्यास कर्करोगासारखे गंभीर आजारही निर्माण होऊ शकतात.

जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार दरवर्षी सुमारे ६० कोटी लोक दूषित अन्नामुळे आजारी पडतात आणि सुमारे ४ लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू होतो. ही आकडेवारी केवळ आकडे नसून मानवजातीसमोरील गंभीर आरोग्य संकटाचे प्रतीक आहे. विशेषतः लहान मुले, गर्भवती महिला, वृद्ध व्यक्ती आणि कमकुवत प्रतिकारशक्ती असलेले लोक या समस्येमुळे अधिक प्रभावित होतात. अन्नजन्य आजारांमुळे केवळ आरोग्यच नव्हे तर आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थाही प्रभावित होते. आजारी व्यक्ती काम करू शकत नाही, त्यामुळे उत्पादनक्षमता घटते, कुटुंबावर आर्थिक भार वाढतो आणि देशाच्या विकासावर परिणाम होतो. अन्न सुरक्षा ही संकल्पना 'शेतापासून ताटापर्यंत' या संपूर्ण साखळीशी संबंधित आहे. अन्न उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक, वाहतूक, विक्री आणि सेवन या प्रत्येक टप्प्यावर सुरक्षितता राखणे आवश्यक आहे. शेतीच्या टप्प्यावर रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा अतिरेकी वापर झाल्यास त्यांचे अवशेष पिकांमध्ये राहतात. कापणीनंतर अन्नाची योग्य साठवणूक न झाल्यास बुरशी आणि जीवाणूंची वाढ होते. वाहतुकीदरम्यान स्वच्छतेचा अभाव आणि तापमान नियंत्रण नसेल तर अन्न खराब होते. अन्न प्रक्रिया उद्योगांमध्ये अस्वच्छता असल्यास मोठ्या प्रमाणावर अन्न दूषित होऊ शकते. शेवटी घरगुती पातळीवर अन्न हाताळताना निष्काळजीपणा झाल्यास आरोग्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे संपूर्ण अन्न साखळीतील प्रत्येक घटकाची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे.

भारतात अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण ही प्रमुख संस्था कार्यरत आहे. २००६ च्या अन्न सुरक्षा आणि मानके कायद्याअंतर्गत ही संस्था अन्न उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक, वितरण आणि विक्री यांचे नियमन करते. ही संस्था अन्नासाठी मानके निश्चित करते, तपासण्या करते, परवाने देते आणि जनजागृती मोहीम राबवते. 'ईट राईट इंडिया' सारख्या मोहिमांद्वारे नागरिकांना सुरक्षित आणि संतुलित आहार घेण्यास प्रोत्साहित केले जाते. तरीही देशात अन्न भेसळीची समस्या गंभीर आहे. दूध, तूप, तेल, मसाले, मिठाई, फळे आणि इतर पदार्थांमध्ये भेसळ केल्याच्या घटना वारंवार घडतात. अधिक नफा मिळवण्यासाठी काही व्यापारी स्वस्त व घातक पदार्थ अन्नामध्ये मिसळतात, जे आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक ठरते.

अन्न भेसळीचे परिणाम केवळ तात्काळ आजारांपुरते मर्यादित नसून दीर्घकालीन आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरतात. कृत्रिम रंग आणि रसायने यकृतावर परिणाम करतात, डिटर्जंटयुक्त दूध मूत्रपिंडावर परिणाम करते, तर रासायनिक मसाले कर्करोगाचा धोका वाढवतात. त्यामुळे अन्न भेसळीविरोधात कठोर कायदे, नियमित तपासणी आणि कठोर शिक्षा आवश्यक आहे. त्याचबरोबर ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. ग्राहकांची भूमिका अन्न सुरक्षेमध्ये अत्यंत महत्त्वाची आहे. ग्राहकांनी अन्न खरेदी करताना उत्पादनाची मुदत, घटकांची माहिती, प्रमाणपत्रे आणि पॅकेजिंग तपासणे आवश्यक आहे. घरामध्ये अन्न तयार करताना स्वच्छता पाळणे अत्यावश्यक आहे. हात धुणे, स्वयंपाकघर स्वच्छ ठेवणे, कच्चे आणि शिजवलेले अन्न वेगळे ठेवणे आणि योग्य तापमानात अन्न शिजवणे या सवयी अंगीकारणे आवश्यक आहे. उरलेले अन्न योग्य प्रकारे साठवणे आणि वेळेत वापरणेही महत्त्वाचे आहे. लहान निष्काळजीपणामुळे मोठे आरोग्य धोके निर्माण होऊ शकतात.

जागतिक आरोग्य संघटनेने अन्न सुरक्षिततेसाठी पाच मूलभूत तत्त्वे सांगितली आहेत. स्वच्छता राखणे, कच्चे आणि शिजवलेले अन्न वेगळे ठेवणे, अन्न पूर्णपणे शिजवणे, सुरक्षित तापमान राखणे आणि सुरक्षित पाणी वापरणे ही ती तत्त्वे आहेत. या तत्त्वांचे पालन केल्यास अन्नजन्य आजारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर कमी होऊ शकते. अन्न सुरक्षा आणि पोषण यांचा घनिष्ठ संबंध आहे. सुरक्षित अन्न म्हणजेच पौष्टिक अन्न असे नाही, परंतु दोन्ही परस्परपूरक आहेत. कुपोषणामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते आणि त्यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढतो. भारतात अजूनही कुपोषण, ॲनिमिया आणि बालकांच्या वाढीतील अडथळे ही गंभीर समस्या आहे. त्यामुळे अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षा दोन्ही आवश्यक आहेत. हवामान बदलाचा अन्न सुरक्षेवर मोठा परिणाम होत आहे. तापमानवाढ, दुष्काळ, पूर आणि अनियमित हवामानामुळे कृषी उत्पादनावर परिणाम होतो. वाढत्या तापमानामुळे अन्नामध्ये सूक्ष्मजीवांची वाढ जलद होते. त्यामुळे अन्न खराब होण्याचा धोका वाढतो. हवामान बदलामुळे कीटकांचा प्रादुर्भाव वाढतो आणि अधिक कीटकनाशकांचा वापर करावा लागतो, ज्यामुळे अन्नामध्ये रासायनिक अवशेष वाढतात. त्यामुळे शाश्वत शेती पद्धती अत्यंत आवश्यक बनल्या आहेत.

जागतिकीकरणामुळे अन्न व्यापार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. एका देशातील अन्न दुसऱ्या देशात सहज पोहोचते. त्यामुळे अन्न सुरक्षेची मानके आंतरराष्ट्रीय स्तरावर समान असणे आवश्यक आहे. कोडेक्स अलिमेंटेरियस कमिशन सारख्या संस्था जागतिक अन्न मानके निश्चित करतात. यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार सुरक्षित आणि पारदर्शक राहतो. कोविड-१९ महामारीच्या काळात अन्न सुरक्षेचे महत्त्व अधिक स्पष्ट झाले. लॉकडाऊनमुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली, परंतु अन्न पुरवठा सुरक्षित ठेवणे हे मोठे आव्हान होते. या काळात स्वच्छता, पॅकेजिंग आणि वितरण यावर विशेष लक्ष देण्यात आले. या अनुभवातून भविष्यातील अन्न प्रणाली अधिक मजबूत आणि लवचिक बनवण्याची गरज अधोरेखित झाली. शहरी भागात स्ट्रीट फूड संस्कृती मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. परंतु अस्वच्छता, दूषित पाणी आणि अयोग्य साठवणूक यामुळे अन्नजन्य आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे खाद्यविक्रेत्यांना प्रशिक्षण देणे, परवाना व्यवस्था मजबूत करणे आणि नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानामुळे अन्न सुरक्षेत मोठी क्रांती घडली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन, डिजिटल ट्रॅकिंग आणि आधुनिक प्रयोगशाळा यांच्या मदतीने अन्नाचा संपूर्ण प्रवास ट्रॅक करता येतो. दूषित अन्नाचा स्रोत शोधणे आणि त्यावर तात्काळ कारवाई करणे शक्य झाले आहे. अन्न वाया जाणे ही देखील गंभीर समस्या आहे. जगभरात मोठ्या प्रमाणावर अन्न वाया जाते, तर दुसरीकडे लाखो लोक उपाशी राहतात. अन्नाची नासाडी कमी केल्यास अन्न सुरक्षा सुधारू शकते आणि पर्यावरणावरचा ताण कमी होऊ शकतो. त्यामुळे अन्नाचा योग्य वापर आवश्यक आहे. ग्रामीण भागात शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती आणि सुरक्षित उत्पादन पद्धती याबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. शेतकरी सुरक्षित उत्पादन केल्यास संपूर्ण अन्न साखळी सुरक्षित होते. अन्न सुरक्षा ही शाश्वत विकास उद्दिष्टांशी जोडलेली आहे. भूकमुक्त समाज, उत्तम आरोग्य, शाश्वत शेती आणि जबाबदार उत्पादन यासाठी अन्न सुरक्षा अत्यावश्यक आहे. शेवटी असे म्हणता येईल की जागतिक अन्न सुरक्षा दिन हा मानवजातीला सुरक्षित अन्नाचे महत्त्व समजावून सांगणारा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. सुरक्षित अन्न हे निरोगी जीवनाचे आधार आहे. सरकार, उद्योग, शेतकरी, वैज्ञानिक आणि ग्राहक या सर्वांनी मिळून अन्न सुरक्षा सुनिश्चित करणे आवश्यक आहे. सुरक्षित अन्न म्हणजे निरोगी जीवन आणि निरोगी जीवन म्हणजे समृद्ध समाज हा संदेश स्वीकारल्यास आपण अधिक सुरक्षित, सक्षम आणि शाश्वत भविष्य घडवू शकतो.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# बदलत्या मान्सूनसमोर शेतकऱ्यांची नवी लढाई : पिकनियोजन, पाणी व्यवस्थापन आणि शाश्वत शेतीची गरज

**भारतीय** शेतीचे भविष्य अजूनही मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. शेतकऱ्याच्या वर्षभराच्या कष्टांचे, अपेक्षांचे आणि आर्थिक नियोजनाचे केंद्र म्हणजे मान्सून. पावसाची वेळ, त्याचे प्रमाण, त्याचे वितरण आणि हंगामातील सातत्य यावरच खरीप हंगामाची दिशा ठरते. परंतु गेल्या काही वर्षांत मान्सूनचा स्वभाव झपाट्याने बदलताना दिसत आहे. कधी पाऊस वेळेवर येत नाही, कधी सुरुवातीला जोरदार बरसतो आणि नंतर दीर्घ खंड पडतो, तर कधी काही दिवसांत अतिवृष्टी होऊन महिन्याचा पाऊस संपतो. या बदलत्या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांसमोर केवळ पिक उत्पादनाचे नव्हे, तर शेती टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

पूर्वी शेतीचे गणित तुलनेने स्थिर होते. जूनमध्ये पाऊस सुरू झाला की मशागत, पेरणी आणि हंगामाचे नियोजन निश्चित पद्धतीने केले जात असे. शेतकऱ्यांना त्यांच्या परिसरातील पावसाचा साधारण अंदाज अनुभवातून माहीत असे. कोणत्या भागात कापूस घ्यायचा, कुठे सोयाबीन, कुठे तूर, कुठे बाजरी-ज्वारी, कुठे भुईमूग, याची एक पद्धत तयार झाली होती. परंतु हवामान बदलामुळे ही जुनी समीकरणे मोडू लागली आहेत. यामुळे आता शेतकऱ्यांना केवळ पेरणीची तारीख बदलून चालणार नाही, तर संपूर्ण पिकनियोजन, जलव्यवस्थापन आणि जोखीम व्यवस्थापन यांचा नव्याने विचार करावा लागणार आहे.

आजची सर्वात मोठी समस्या म्हणजे पावसाचे असमान वितरण. काही भागांत पाऊस वेळेवर सुरू होतो, परंतु नंतर दोन ते तीन आठवड्यांचा खंड पडतो. काही भागांत पहिल्या पावसावर पेरणी केली जाते; पण त्यानंतर ओल टिकत नाही आणि उगवलेले पीक करपू लागते. काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे पेरलेले बियाणे वाहून जाते, शेतात पाणी साचते, मातीची धूप होते आणि पिकांची वाढ खुंटते. यामुळे पेरणीपासून काढणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर अनिश्चितता वाढली आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांचे नुकसान केवळ उत्पादनात होत नाही, तर बियाणे, खत, मजुरी, मशागत, फवारणी, डिझेल आणि दुबार पेरणी यामुळे आर्थिक ताण अधिक वाढतो.

म्हणूनच बदलत्या मान्सूनकडे केवळ हवामानातील चढ-उतार म्हणून पाहणे आता परवडणारे नाही. हा विषय शेतीच्या केंद्रस्थानी आणावा लागेल. पावसाचा बदलता स्वभाव लक्षात घेऊन शेतीचे नियोजन करणे ही काळाची गरज आहे. शेतकऱ्याने आता ङ्गनेहमीचीच पिके, नेहमीचीच वेळ आणि नेहमीचीच पद्धतङ्घ या विचारातून बाहेर पडले पाहिजे. त्याऐवजी जमिनीचा प्रकार, उपलब्ध ओलावा, स्थानिक पर्जन्यमान, पुढील आठवड्यांचा हवामान अंदाज, पाण्याची उपलब्धता आणि बाजारपेठेची स्थिती या सर्व बाबी लक्षात घेऊन पिकांची निवड करावी लागेल.

उशिरा पाऊस सुरू झाल्यास किंवा पेरणीनंतर मोठा खंड पडण्याची शक्यता असल्यास कमी कालावधीची आणि कमी पाण्यावर येणारी पिके अधिक सुरक्षित ठरतात. मूग, उडीद, तीळ, बाजरी, ज्वारी, काही कमी कालावधीची डाळी आणि चारापिके यांचा अशा परिस्थितीत गांभीर्याने विचार केला पाहिजे. ही पिके तुलनेने कमी पाण्यावर तग धरतात, जोखीम कमी करतात आणि काही प्रमाणात रोख उत्पन्न देऊ शकतात. दुसरीकडे, दीर्घ कालावधीची आणि अधिक पाणी मागणारी पिके पावसात खंड पडल्यास मोठ्या संकटात सापडतात. त्यामुळे पावसाच्या आगमनात उशीर झाला तर शेतकऱ्याने ङ्गआधी ठरवलेलेच पीकङ्घ घेण्याचा हट्ट न धरता परिस्थितीनुसार पर्याय स्वीकारणे अधिक शहाणपणाचे ठरेल.

जमिनीचा प्रकार हा पिकनियोजनातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. हलकी जमीन पाणी कमी धरते, त्यामुळे पावसाचा खंड पडल्यास अशा जमिनीतील पिके लगेच ताणात येतात. म्हणून हलक्या जमिनीत कमी कालावधीची, कमी पाणी मागणारी आणि कोरडवाहू परिस्थितीत तग धरणारी पिके निवडणे अधिक योग्य ठरते. बाजरी, तीळ, मूग, उडीद, काही भागात नाचणी, चारा ज्वारी यांसारखी पिके हलक्या जमिनीत सुरक्षित पर्याय ठरू शकतात. अशा जमिनीत पहिल्या पावसावर घाईघाईने पेरणी करण्याऐवजी जमिनीत पुरेशी ओल साठल्याची खात्री करूनच निर्णय घेणे हिताचे आहे.

मध्यम ते भारी जमिनीत परिस्थिती थोडी वेगळी असते. अशा जमिनीत ओल टिकवून ठेवण्याची क्षमता अधिक असल्याने सोयाबीन, तूर, कापूस, मका, भुईमूग यांसारख्या पिकांचा विचार करता येतो. मात्र याचा अर्थ असा नाही की अशा जमिनीत कोणतीही जोखीम नाही. उशिरा पेरणी, पाण्याचा अतिरेक, निचऱ्याचा अभाव किंवा दीर्घ खंड यांचा परिणाम या पिकांवरही होतो. म्हणून मध्यम आणि भारी जमिनीतही पेरणीचा निर्णय हवामान अंदाज, जमिनीतील ओलावा आणि पुढील पावसाची शक्यता पाहूनच घ्यावा लागेल. एकच मोठा पाऊस झाला म्हणून संपूर्ण क्षेत्रावर पेरणी करणे धोकादायक ठरू शकते.

बदलत्या मान्सूनमध्ये एकपिकी पद्धतीची जोखीम अधिक स्पष्टपणे दिसून येते. एखाद्या वर्षी कापसाला चांगला भाव मिळाला म्हणून सर्वच क्षेत्र कापसाखाली देणे, किंवा मागील वर्षी सोयाबीनचे उत्पादन चांगले आले म्हणून संपूर्ण शेतात सोयाबीन पेरणे, ही पद्धत अनिश्चित हवामानात धोकादायक आहे. कारण एकच पीक फसले, तर संपूर्ण हंगामाचा आर्थिक पाया कोसळतो. यावर उपाय म्हणून मिश्रपीक आणि आंतरपीक पद्धतीला नव्याने महत्त्व द्यावे लागेल. तूर + सोयाबीन, कापूस + मूग, ज्वारी + तूर, मका + उडीद, भुईमूग + तूर यांसारख्या पद्धतींमुळे जोखीम विभागली जाते. एका पिकाला फटका बसला, तरी दुसरे पीक आधार देऊ शकते. जमिनीची सुपीकता राखणे, तणनियंत्रण, कीडरोग व्यवस्थापन आणि आर्थिक सुरक्षितता या सर्व बाबतीत आंतरपीक पद्धती अधिक उपयुक्त ठरते.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने चारापिकांचे नियोजन हा मुद्दा तितकाच महत्त्वाचा आहे. बदलत्या पावसामुळे केवळ धान्य किंवा नगदी पिकेच अडचणीत येत नाहीत, तर जनावरांच्या चाऱ्याचाही गंभीर प्रश्न निर्माण होतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुपालन हा महत्त्वाचा आधार आहे. अनेक शेतकरी शेतीसोबत दुधाच्या उत्पन्नावर कुटुंबाचा खर्च भागवतात. अशा वेळी हिरव्या चाऱ्याचा तुटवडा निर्माण झाला, तर दुधाचे अर्थकारणही डळमळते. म्हणून प्रत्येक शेतकऱ्याने काही क्षेत्र चारापिकांसाठी राखून ठेवणे आवश्यक आहे. ज्वारी चारा, मका चारा, बाजरी चारा, नेपियर, गिनी गवत, लुसर्न यांसारख्या पिकांचा परिसर, पाणी उपलब्धता आणि गरजेनुसार विचार करणे आवश्यक आहे. ङ्गपिकासोबत चाराङ्घ ही संकल्पना बदलत्या हवामानात आर्थिक सुरक्षेची हमी ठरू शकते.

हवामान अंदाजाचा वापर हा आजच्या शेतीतील महत्त्वाचा निर्णयात्मक घटक बनला पाहिजे. पूर्वी हवामान अंदाज मर्यादित प्रमाणात उपलब्ध असे; परंतु आज मोबाईल, ॲप्स, कृषी विभागाचे संदेश, वृत्तपत्रे आणि दूरदर्शन यांच्या माध्यमातून विभागनिहाय अंदाज सहज मिळतात. तरीही अनेकदा अंदाज फक्त माहिती म्हणून घेतला जातो; त्यावर आधारित निर्णय घेतले जात नाहीत. हीच सवय बदलावी लागेल. पुढील सात ते दहा दिवस पावसाची शक्यता नसेल, तर पेरणी पुढे ढकलणे कधी कधी फायदेशीर ठरते. मुसळधार पावसाचा अंदाज असेल, तर निचऱ्याची व्यवस्था, खत व्यवस्थापन आणि कीडरोग नियंत्रणाची तयारी करावी लागते. खंड पडण्याची शक्यता असेल, तर ओल जपण्यासाठी आंतरमशागत, कोळपणी आणि तणनियंत्रण करणे गरजेचे असते. हवामान अंदाजाला काय होईल ते पाहू या भूमिकेऐवजी शेती व्यवस्थापनाचे साधन म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे. मातीतील ओलावा जपणे ही बदलत्या पावसातील शेतीची जीवनरेखा आहे. पाऊस कमी पडला, उशिरा आला किंवा खंडित झाला, तरी जमिनीत साठवलेली ओल काही दिवस पिकाला आधार देऊ शकते. त्यामुळे ओलसंवर्धनाचे उपाय आता पर्याय राहिलेले नाहीत, तर ते आवश्यक बनले आहेत. समतल नांगरट, आडवे बांध, सरी-वरंबा पद्धत, शेतात पाणी अडवून मुरवणे, पिकांचे अवशेष जमिनीवर ठेवणे, सेंद्रिय खतांचा वापर वाढवणे, तणनियंत्रण, शेततळी, कंपार्टमेंट बंडींग, नाला बांध, ठिबक आणि तुषार सिंचन यांसारखे उपाय मोठा फरक घडवू शकतात. अनेकदा हे उपाय ङ्गअतिरिक्त कामङ्घ वाटतात; परंतु पावसातील एका मोठ्या खंडात हाच साठवलेला ओलावा पिकाचे प्राण वाचवतो.

महाराष्ट्रातील खरीप हंगामात कापूस, सोयाबीन आणि तूर ही प्रमुख पिके आहेत. परंतु बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर या पिकांकडेही नव्या दृष्टीने पाहावे लागेल. कापूस हे दीर्घ कालावधीचे पीक आहे. सुरुवातीला चांगली ओल, नंतर सातत्यपूर्ण पाऊस आणि शेवटी योग्य हवामान यांची त्याला गरज असते. पेरणी उशिरा झाली किंवा सुरुवातीलाच पावसाचा खंड पडला, तर उत्पादनावर मोठा परिणाम होतो. म्हणून कापसाची पेरणी पुरेशा पावसाची खात्री झाल्यावर आणि शिफारस केलेल्या कालावधीतच करणे योग्य आहे. सोयाबीनलाही सुरुवातीला चांगली ओल हवी; पण पाणथळ अजिबात चालत नाही. त्यामुळे निचरा व्यवस्थापन, योग्य वाणांची निवड आणि वेळेवर तणनियंत्रण महत्त्वाचे ठरते. तूर हे तुलनेने ताण सहन करणारे पीक असले, तरी त्याचेही योग्य कालावधीतील नियोजन आवश्यक आहे. तूरला आंतरपीक म्हणून स्थान दिल्यास जोखीम कमी करता येते.

दुबार पेरणी हा आजच्या बदलत्या पावसाळ्यात अनेक शेतकऱ्यांसाठी वास्तव बनला आहे. पेरणीनंतर पाऊस गायब झाला, उगवण निकृष्ट झाली किंवा अतिवृष्टीमुळे नुकसान झाले, तर दुबार पेरणी अपरिहार्य होते. अशा परिस्थितीत शेतकऱ्याने घाबरून न जाता पर्यायी नियोजन ठेवणे आवश्यक आहे. राखीव बियाणे, कमी कालावधीच्या पिकांचा पर्याय, बियाणे प्रक्रिया, टप्प्याटप्प्याने पेरणी, स्थानिक कृषी तज्ज्ञांचा सल्ला आणि जमिनीतील उपलब्ध ओलाव्याचे मूल्यमापन यामुळे नुकसान काही प्रमाणात कमी करता येते. आजच्या काळात ङ्गएकदाच पेरणी आणि काम संपलेङ्घ अशी मानसिकता बदलून ङ्गपरिस्थितीनुसार निर्णय बदलण्याची तयारीङ्घ ठेवावी लागणार आहे.

शेतीला हवामान-लवचिक बनवणे ही आता केवळ संशोधन संस्थांची संकल्पना राहिलेली नाही; ती शेतकऱ्यांच्या भवितव्यासाठी अपरिहार्य झाली आहे. हवामान-लवचिक शेती म्हणजे बदलत्या पावसाशी, तापमानाशी, कीडरोगांच्या बदलत्या स्वरूपाशी आणि बाजारातील अनिश्चिततेशी जुळवून घेणारी शेती. यासाठी प्रदेशनिहाय पीक आराखडे, कमी कालावधीचे व ताण सहन करणारे वाण, जलसंधारण, पूरक व्यवसाय, पीकविमा आणि स्थानिक पातळीवरील कृषी सल्ला यांचा एकत्रित वापर आवश्यक आहे. शेती फक्त पिकउत्पादनापुरती मर्यादित न ठेवता, पशुपालन, बागायती, कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन, प्रक्रिया उद्योग, साठवण आणि बाजारपेठ यांच्याशी जोडणेही महत्त्वाचे ठरेल.

या सर्व प्रक्रियेत शासन आणि कृषी यंत्रणेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांना ङ्गपिकांचे नियोजन बदलाङ्घ असे सांगणे पुरेसे नाही; तर त्यासाठी वेळेवर मार्गदर्शन, योग्य बियाण्यांची उपलब्धता, तालुकानिहाय हवामानाधारित पिकसल्ले, जलसंधारणासाठी प्रोत्साहन, चाराबँक, पीकविमा दाव्यांची जलद अंमलबजावणी आणि कृषी विज्ञान केंद्रांमार्फत प्रत्यक्ष प्रात्यक्षिके यांची गरज आहे. हवामान बदलाच्या काळात कृषी विस्तार यंत्रणा अधिक सजग, गतिमान आणि शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणारी असावी लागेल.

आजचा शेतकरी केवळ पावसाची वाट पाहणारा राहू शकत नाही; तर पावसाच्या बदलत्या स्वरूपाचे व्यवस्थापन करणारा उत्पादक बनणे हीच काळाची मागणी आहे. यासाठी मानसिकतेत बदल, माहितीचा वापर, जोखीम विभागणी, पाण्याचे नियोजन आणि शास्त्राधारित निर्णय या पाच गोष्टी अत्यावश्यक आहेत. बदलत्या मान्सूनसमोर शेतकऱ्यांची लढाई कठीण नक्की आहे; पण ती अशक्य नाही. योग्य नियोजन, योग्य पिकनिवड, ओलसंवर्धन, आंतरपीक, चारापिके, पूरक व्यवसाय आणि स्थानिक सल्ला यांच्या आधारे शेतकरी या आव्हानातून मार्ग काढू शकतो. पाऊस लांबतो, कधी दगा देतो, कधी अति बरसतो; पण शेती थांबत नाही. मात्र शेती टिकवायची असेल, तर तिची पद्धत बदलावी लागेल. बदलत्या हवामानाच्या काळात सुरक्षित शेती म्हणजे फक्त जास्त उत्पादन नव्हे, तर कमी जोखमीची, पाणी जपणारी, पर्यायी उत्पन्न देणारी आणि संकटातूनही उभी राहणारी शेती. म्हणूनच आजची खरी गरज आहे ती एका नव्या कृषी विचाराची ङ्घ मान्सूनवर अवलंबून राहणाऱ्या शेतीकडून मान्सूनचे व्यवस्थापन करणाऱ्या शेतीकडे वाटचाल करण्याची. हाच बदल शेतकऱ्याच्या भविष्यासाठी, ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी आणि राज्याच्या अन्नसुरक्षेसाठी निर्णायक ठरणार आहे.

**– डॉ. भागवत राजाभाऊ चव्हाण,**

(लेखक कृषी वनस्पतीशास्त्राचे अभ्यासक आहेत)

मो.नं. ८७ ६७ ४५६ ४५५

# विद्यार्थ्यांचे जीव जात आहेत, शिक्षण व्यवस्थेच्या अपयशाला जबाबदार कोण?

**देशाच्या** भवितव्याचा पाया असलेले विद्यार्थी आज भीती, नैराश्य आणि असुरक्षिततेच्या गर्तेत ढकलले जात आहेत. स्पर्धा परीक्षा, पेपरफुटी, पुनर्परीक्षा, वाढता मानसिक ताण आणि त्यातून घडणाऱ्या आत्महत्या या घटना आता अपवाद राहिलेल्या नाहीत. त्या आपल्या शिक्षण व्यवस्थेच्या गंभीर अपयशाचे प्रतीक बनल्या आहेत. अशा पार्श्वभूमीवर कॉकरोच जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेले खुले पत्र देशातील लाखो विद्यार्थी आणि पालकांच्या वेदनेला शब्द देणारे ठरले आहे. या पत्रात अलिकडच्या काही आठवड्यांत ११ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यापैकी पाच विद्यार्थ्यांचे मृत्यू अवघ्या ४८ तासांत झाले. ही आकडेवारी केवळ संख्या नाही तर ती उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांची, तुटलेल्या स्वप्नांची आणि व्यवस्थेवरील विश्वास गमावलेल्या तरुणाईची वेदनादायी कहाणी आहे. प्रत्येक आत्महत्येमागे एका कुटुंबाचा संघर्ष, त्याग आणि मुलांच्या भविष्याविषयीच्या अपेक्षा दडलेल्या असतात.

आज शिक्षण हे गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी सर्वात मोठी गुंतवणूक बनले आहे. मुलांना डॉक्टर, अभियंता, प्रशासकीय अधिकारी किंवा इतर प्रतिष्ठित क्षेत्रांत पोहोचवण्यासाठी पालक कर्ज काढतात, जमीन विकतात आणि आयुष्यभराची बचत खर्च करतात. मात्र परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्टाचार, पेपरफुटी आणि प्रशासकीय निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले की या कुटुंबांवर दुहेरी संकट कोसळते. एकीकडे मुलाचे निधन आणि दुसरीकडे आर्थिक विनाश. याच पार्श्वभूमीवर दिपके यांनी आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना एक कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. या मागणीचा गाभा आर्थिक मदतीपेक्षा राज्याच्या नैतिक जबाबदारीशी संबंधित आहे. जर व्यवस्थेतील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होत असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. केवळ शोक व्यक्त करून किंवा चौकशी समित्या नेमून शासनाची जबाबदारी संपत नाही.

गेल्या काही वर्षांत विविध स्पर्धा परीक्षांच्या पेपरफुटीच्या घटना वारंवार घडल्या आहेत. लाखो विद्यार्थी रात्रंदिवस अभ्यास करून परीक्षा देतात आणि नंतर पेपरफुटीमुळे पुनर्परीक्षेची वेळ येते. यामुळे केवळ वेळ आणि पैसा वाया जात नाही, तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि व्यवस्थेवरील विश्वासही डळमळीत होतो. मेहनतीपेक्षा गैरव्यवहाराला महत्त्व मिळत असल्याची भावना तरुणांच्या मनात निर्माण होणे ही लोकशाहीसाठी धोक्याची बाब आहे. याहून अधिक चिंताजनक बाब म्हणजे शिक्षण व्यवस्थेचे वाढते व्यापारीकरण. महागडे कोचिंग क्लासेस, वाढती फी, स्पर्धेचे प्रचंड दडपण आणि यशाला दिले जाणारे अवास्तव महत्त्व यामुळे विद्यार्थ्यांवर मानसिक ताण वाढत आहे. अनेकदा अपयश हे जीवनाचा भाग आहे हे सांगण्याऐवजी त्याला कलंक मानले जाते. परिणामी अनेक विद्यार्थी मानसिकदृष्ट्या एकाकी पडतात. आत्महत्या ही वैयक्तिक कमकुवतपणाची नव्हे, तर सामाजिक आणि संस्थात्मक अपयशाची घटना असते, हे वास्तव स्वीकारण्याची वेळ आली आहे. दिपके यांच्या पत्रात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात आली आहे. लोकशाही व्यवस्थेत उत्तरदायित्व निश्चित करणे आवश्यक असते. मात्र केवळ एका व्यक्तीच्या बदलाने समस्या सुटणार नाही. परीक्षा प्रणाली, भरती प्रक्रिया, नियोजन यंत्रणा आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याशी संबंधित धोरणांचे व्यापक पुनर्मूल्यांकन करणे तितकेच गरजेचे आहे.

आज विद्यार्थी सरकारकडे केवळ नोकऱ्या किंवा परीक्षा मागत नाहीत तर ते न्याय आणि पारदर्शकता मागत आहेत. त्यांना खात्री हवी आहे की त्यांच्या मेहनतीची चोरी होणार नाही. त्यांना अशी व्यवस्था हवी आहे जिथे भ्रष्टाचाराला संरक्षण मिळणार नाही आणि प्रामाणिक प्रयत्नांना योग्य संधी मिळेल. शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास हा कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचा पाया असतो. तोच जर ढासळला तर सामाजिक अस्थिरता निर्माण होण्याचा धोका वाढतो.

विद्यार्थी आत्महत्यांकडे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. हा सामाजिक न्याय, शिक्षणाचा अधिकार आणि मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. एखादी रेल्वे दुर्घटना किंवा पूल दुर्घटना घडली तर जबाबदारी निश्चित केली जाते. मग विद्यार्थ्यांच्या मृत्यूंच्या मालिकेनंतरही शिक्षण व्यवस्थेतील दोषींना जबाबदार का धरले जात नाही, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. या परिस्थितीत व्यापक सुधारणांची गरज आहे. परीक्षा प्रक्रियेत अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा, पेपरफुटी विरोधी कठोर कायदे, दोषींवर तातडीने कारवाई, विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य सहाय्य केंद्रे, मोफत समुपदेशन सेवा आणि पालकांसाठी जागृती कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. तसेच आत्महत्यांच्या घटनांचा सखोल अभ्यास करून त्यामागील सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय कारणे शोधली पाहिजेत. दिपके यांचे पत्र हे केवळ एका राजकीय पक्षाचे निवेदन म्हणून पाहण्यापेक्षा शिक्षण व्यवस्थेला विचारलेला अस्वस्थ करणारा प्रश्न म्हणून पाहिले पाहिजे. देशाचा तरुण वर्ग जर आशाहीन झाला, तर कोणत्याही राष्ट्राचे भविष्य सुरक्षित राहू शकत नाही. विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने जिवंत ठेवणे ही केवळ पालकांची नव्हे, तर राज्याचीही जबाबदारी आहे. आज प्रश्न एकाच विद्यार्थ्याचा किंवा एका परीक्षेचा नाही. प्रश्न आहे त्या संपूर्ण पिढीचा जी आपल्या भवितव्यासाठी संघर्ष करत आहे. त्यांच्या आक्रोशाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे देशाच्या भविष्याकडे दुर्लक्ष करणे होय. आता प्रश्न एवढाच आहे की विद्यार्थ्यांच्या मृत्यूंचा हिशोब कोण देणार? आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे भविष्यात असा प्रश्न पुन्हा निर्माण होणार नाही यासाठी शासन, प्रशासन आणि समाज कोणती ठोस पावले उचलणार? कारण प्रत्येक हरवलेला विद्यार्थी हा केवळ एका कुटुंबाचा नाही, तर संपूर्ण राष्ट्राचा अपूर्ण राहिलेला भविष्यकाळ असतो.

**– प्रवीण बागडे**

# पावसाळ्यात डासजन्य आजारांपासून बचावासाठी करा प्रतिबंधात्मक उपाययोजना

पावसाळा सुरू होत आहे. बदलत्या वातावरणामुळे विविध संसर्गजन्य आजारांचा धोका वाढतो. विशेषतः डासांमुळे पसरणाऱ्या आजारांपासून बचाव करण्यासाठी वेळेत प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्यास आपण स्वतः ला आणि आपल्या कुटुंबाला सुरक्षित ठेवू शकतो. एडीस डासांद्वारे पसरणाऱ्या डेंग्यू, चिकनगुनिया आणि झिका या आजारांच्या प्रतिबंधासाठी शासन व आरोग्य विभागामार्फत विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.




**साथरोगपूर्व तयारी**

डेंग्यूसारख्या आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळिवण्यासाठी संशयित रुग्णांचे वेळेत निदान व नोंदणी केली जाते. तपासणीसाठी आवश्यक किट्स पुरेशा प्रमाणात उपलब्ध ठेवण्यात येतात. रुग्णांची माहिती खकखझ-तइऊ पोर्टलवर दररोज अद्ययावत केली जाते. रुग्णसंख्येत वाढ झाल्यास अतिरिक्त खाटा, औषधे, वैद्यकीय उपकरणे आणि रुग्णवाहिकांची उपलब्धता सुनिश्चित केली जाते.

साथरोग आटोक्यात ठेवण्यासाठी फॉगिंग यंत्रे, स्प्रे पंप आणि इतर कीटकनाशक फवारणीसाठीची उपकरणे कार्यरत स्थितीत ठेवली जातात. तसेच राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार डेंग्यू रुग्ण व्यवस्थापनाबाबत आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमित प्रशिक्षण दिले जाते.

**नागरिकांनी घ्यावयाची काळजी**

- आठवड्यातून एक दिवस - कोरडा दिवस; डासमुक्त परिसर, निरोगी परिवार.
- डासांची उत्पत्ती रोखा, डेंग्यू-चिकनगुनिया-झिका दूर ठेवा.
- डेंग्यू, चिकनगुनिया आणि झिका हे आजार एडीस डासांच्या चाव्यामुळे पसरतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने पुढील प्रतिबंधात्मक उपायांचे पालन करणे आवश्यक आहे.
- घराभोवती व परिसरात साचलेले पाणी नियमितपणे काढून टाकावे.
- पाण्याच्या टाक्या, ड्रम, बादल्या आणि इतर पाणीसाठवणाऱ्या भांड्यांवर झाकण ठेवावे.
- कुलर, फुलदाण्या, टायर व इतर पाणी साचू शकणाऱ्या वस्तू नियमित स्वच्छ कराव्यात.
- डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी आवश्यकतेनुसार लार्वानाशक औषधांचा वापर करावा.
- धूर फवारणी (फॉगिंग) आणि कीटकनाशक फवारणीस सहकार्य करावे.
- डास नियंत्रणाबाबत जनजागृती करून परिसर स्वच्छ ठेवावा.
- पूर्ण बाह्यांचे कपडे परिधान करावेत तसेच डासप्रतिबंधक क्रीम, जाळी किंवा मच्छरदाणीचा वापर करावा.
- ताप, अंगदुखी, सांधेदुखी, डोकेदुखी किंवा पुरळ यांसारखी लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा.

या सर्व उपाययोजनांमुळे एडीस डासांची उत्पत्ती रोखण्यास मदत होते आणि डेंग्यू, चिकनगुनिया व झिका यांसारख्या आजारांचा प्रसार प्रभावीपणे कमी करता येतो.

**- रेखा पालवे-गायकवाड**
उपसंपादक,
विभागीय माहिती कार्यालय
छत्रपती संभाजीनगर

# काँग्रेस रस्त्यावर उतरणार का?

**महाराष्ट्र** प्रदेश काँग्रेस समितीच्यावतीने मुंबईत दादर येथील टिळक भवन या मुख्यालयात, भारतात येणारी आर्थिक सुत्नामी या विषयावर नुकतेच चर्चा सत्र आयोजित केले होते. या कार्यक्रमास माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ, दिल्लीच्या जेएनयुमधील अर्थशास्त्राचे प्रा. अरूणकुमार, अर्थतज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर, ज्येष्ठ संपादक व माजी खासदार कुमार केतकर, ब. विठ्लराव गाडगीळ यांचे सुपुत्र व आर्किटेक्ट अनंतराव गाडगीळ, प्रदेश काँग्रेसच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख विश्वास उटगी अशी बुध्दीवादी मंडळी मंचावर उपस्थित होती. प्रमुख भाषण झाले ते माजी केंद्रीयमंत्री यशवंत सिन्हा यांचे.

प्रदेश काँग्रेसमधील अर्थविषय चर्चासत्राचा अजेंडा अखिल भारतीय काँग्रेसकडून आला असावा. देशाची ढासळलेली अर्थव्यवस्था, महागाईचा उसळलेला डोंब, पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसच्या दरात झालेली प्रचंड वाढ, विकास दराचे संशयास्पद आकडे, सुशिक्षित तरूणांमधील महाप्रचंड बेरोजगारी, सामान्य माणसाचे जीवन सुखावह राहीलेले नाही, राज्यकर्ते व जनता यांच्यात फार मोठे अंतर पडलेले आहे. वृत्तपत्रे व टीव्ही वृत्तवाहिन्यांवर वास्तव चित्र मांडले जात नाही. भाजपाचे सरकार केवळ उत्सव व घोषणाबाजीत व्यस्त आहे. विरोधी पक्षाला कमजोर करण्यासाठी तपास यंत्रणांचा मुक्तपणे वापर होतो आहे. अशा मुद्यांवर आवाज उठविण्याची वेळ आली आहे, याची काँग्रेस पक्षाला जाणीव झाली आहे. माजी केंद्रीय मंत्री यशवंत सिन्हा हे या चर्चासत्राचे आकर्षण होते. ते अगोदर आयएएस अधिकारी होते. नंतर चंद्रशेखर व अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारमधे मंत्री होते. देशाचे अर्थ व परराष्ट्रमंत्री म्हणून त्यांनी काम केले आहे. मोदी सरकारच्या कामगिरीबाबत झालेल्या मतभेदानंतर ते भाजपाचा राजीनामा देऊन बाहेर पडले. वयाची ऐंशी पार केलेले यशवंत सिन्हा हातात काठी घेऊन टिळक भवनचे दोन मजले चढून सभागृहात भाषणासाठी आले. काँग्रेस पक्ष राज्यात व केंद्रात दीर्घ काळ सत्तेवर होता पण मुंबईतील टिळक भवनाला लिफ्ट उभारली नाही, हे मला इथे येईपर्यंत ठाऊक नव्हते, अशी मार्मिक टिपणीही त्यांनी भाषणाच्या सुरूवातीला केली.

ज्यांनी अटल बिहारी वाजपेयी किंवा लालकृष्ण अडवाणी यांचा विश्वास प्राप्त केला होता, भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते म्हणून दिल्लीत पत्रकारांना संबोधित करीत असत. त्या यशवंत सिन्हांची ओळख आज मोदी विरोधक म्हणून झाली आहे. कोणाचीही पर्वा न करता सिन्हा आपली भुमिका रोखठोकपणे मांडत असतात. त्यांनी भाजपामधे असताना काँग्रेसने देशासाठी काय केले असे प्रश्न कधी विचारले नाहीत. काँग्रेसच्या माजी पंतप्रधानांवर त्यांनी कधी वैयक्तिक टीका केली नाही. आता ते काँग्रेसच्या व्यासपीठावर येऊन मोदी सरकारवर यथेच्छ टीका करू लागले आहेत, मोदी सरकारच्या विकास दराबाबत शंका व्यक्त करीत आहेत. एवढेच नव्हे तर देश येणाऱ्या आर्थिक सुत्नामीपासून वाचवायचे असेल तर मोदी मस्ट गो असे परखडपणे सांगत आहेत. राहूल गांधींच्या सुरात सूर मिसळून यशवंत सिन्हा मोदी सरकारवर आगपाखड करताना दिसत आहेत.

भारत सरकार विकास दराचे आखडे फुगवून सांगत आहे असे आंतरराष्ट्रीय नाणे निधिनेच आपल्या अहवालात म्हटले असल्याचे सांगत सिन्हा यांनी त्या अहवालातील काही परिच्छेद वाचून दाखवले. भाजापाचा जोर सतत प्रचारावर आहे पण वास्तवता दूर आहे. विकास दर ७.७ असल्याचा ते दावा करतात पण तो ६.५ पेक्षा जास्त नसावा असे ते सांगत आहेत. सरकारची विश्वासार्हता संपली आहे. सरकार वारंवार खोटे बोलत आहे असे सिन्हा यांचे आरोप आहेत. देशातील महागाई, बेरोजगारी यांचा अमेरिका- इराण युध्दाशी काहीही संबंध नाही तर मोदी सरकारच्या आर्थिक धोरणांचा तो परिणाम आहे असे सिन्हा ठासून सांगतात. पंडित नेहरूंपासून ते वाजपेयींपर्यंत देशाच्या प्रत्येक पंतप्रधानाने देशावर आलेल्या संकटाशी खंबीरपणे मुकाबला केला, मोदी सरकारमधे संकटाशी मुकाबला करण्याची इच्छाशक्तिच नाही अशीही टीका सिन्हा यांनी केली. भारताने अमेरिकेपुढे शरणागती पत्करली आहे. अमेरिकेचा जो आदेश आहे, त्याचे भारत पालन करीतआहे. त्याचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होत आहे. भारताला हे शोभादायक नाही, असेही सिन्हा यांनी मतप्रदर्शन केले. अमेरिका-इराण युध्दात पाकिस्तान मध्यस्थी करीत होता, तेव्हा विश्वगुरू कुठे होते ? असाही खोचक प्रश्न सिन्हा यांनी विचारला.

देशाचे भविष्य संकटात आहे. ऑफीससमधे बसून किंवा समाज माध्यमांवर आरोप करून काही साध्य होणार नाही, त्यासाठी आता रस्त्यावर उतरावे लागेल. देशाला स्वातंत्र्य काँग्रेसने मिळवून दिले, आताही देशाला काँग्रेसने वाचवावे अशी अपेक्षा यशवंत सिन्हा यांनी केली. वाजपेयी सरकार असताना विरोधकांचा सन्मान केला जात होता, आता विरोधकांनी संपवले जात आहे, यातून देशात भयानक संकट उभे ठाकले आहे, या संकटाचा मुकाबला काँग्रेस पक्षच करू शकतो, ती काँग्रेसची मोठी जबाबदारी आहे, काँग्रेसने जमिनीवर उतरून मुकाबला करण्याचा घेतलेला निर्णय योग्य आहे असेही सिन्हा यांनी म्हटले आहे.

याच चर्चासत्राचा समारोप करताना प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी काँग्रेसला रस्त्यावर उतरून स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढावी लागणार आहे असे जाहीर करून टाकले. दिल्लीत इंडिया आघाडीची बैठक आठ जून रोजी झाली. या बैठकीत राहुल गांधी यांनी केलेले भाषण काँग्रेस पक्षाने सविस्तरपणे उपलब्ध करून दिले. त्यात राहुल यांनी सरकारविरोधात आता रस्त्यावर उतरून आंदोलन केल्याशिवाय पर्याय नाही असे स्पष्ट म्हटले आहे. राहुल गांधी इंडियाच्या बैठकीत म्हणाले- विरोधी पक्ष कमकुवत आहेत हे सिध्द करण्याचा प्रयत्न होत आहे. लोकांना वाटते, आपण भाजपाचा पराभव कसा करणार ? पण आपण एकजुटीने उभे राहिलो, तर भाजपाला हरवणे सोपे आहे. देशात ३५ ते ३७ टक्के मतदार भाजपा आघाडीला मतदान करतात, उर्वरीत विरोधात आहेत. ज्यांना तडजोड करायची होती, ते गेलेले आहेत, आणखीही जाऊ शकतात, नंतर उरलेल्यांना रस्त्यावर संघर्ष करावा लागेल. भाजपा सरकारकडून मुक्त व नि:ष्पक्ष निवडणूक मिळणारच नाही, म्हणूनच आपल्याला प्रतिकारच्या भूमिकेतूनच जावे लागेलः

काँग्रेस पक्ष खरोखरंच रस्त्यावर उतरणार का ? आज तरी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात स्वत:ला झोकून देणाऱ्या तरूणांची फौज नाही. सरकारवर तोफा डागणारे सेनापती बापट, एसएम जोशी, आचार्य अत्रे, कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे, प्रबोधनकार ठाकरे असे कोणी नेते नाहीत. मराठी माणसांची एकजूट करण्यासाठी रस्त्यावर उतरणारे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे नाहीत. इंदिरा गांधी सरकारविरूध्द देशव्यापापी आंदोलन उभारणारे जयप्रकाश नारायण नाहीत. महागाईच्या विरोधात रस्त्यावर उतरणाऱ्या मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर किंवा कमल देसाई नाहीत. लोकपालच्या मागणीसाठी जंतरमंतरवर आंदोलन करून साऱ्या देशाचे लक्ष वेधून घेणारे कोणी अण्णा हजारे पुढे आलेले नाहीत. कॉक्रोच जनता पार्टीने केलेल्या आंदोलनाला मिडियातून प्रसिध्दी मिळत नाही. मोदी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरले तर पोलीस किती गुन्हे दाखल करतील याचा कल्पनही नाही. नेत्यांच्या घरी इडी, आयटी किंवा सीबीआयच्या किती नोटीसा येतील हे सांगता येत नाही. तोड फोडीनंतर विरोधी पक्ष अगोदरच कमजोर झाले आहेत. सरकार विरोधात लढायला रस्त्यावर कोण उतरणार ?

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# मागासवर्गीय लाभार्थ्यांनी जिल्हा परिषदेच्या विविध योजनेच्या लाभासाठी प्रस्ताव सादर करावेत

छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या स्व-उत्पन्नातील २० टक्के निधीतून मागासवर्गीय प्रवर्गासाठी विविध कल्याणकारी योजना २०२६-२७ वर्षासाठी राबविण्यात येत आहे. यामध्ये संगणक, लॅपटॉप, झेरॉक्स मशीन, कडबा कुट्टी यंत्र, शिलाई मशीन, दुग्ध व्यवसाय (रु. ४० हजार अर्थसाहाय्य), शेळी पालन (रु. २५ हजार अर्थसाहाय्य), सायकल वाटप, शेतीसाठी पाईप व ठिबक संच, पिठाची गिरणी, वाचनालय, वेल्डिंग मशीन आणि मालवाहू रिक्षा आदी एकूण १६ प्रकारच्या योजनांचा लाभ दिला जाणार आहे. या योजना १०० टक्के अनुदानावर आधारित असून, पात्र लाभार्थ्यांनी आपले प्रस्ताव दिनांक ३१ जुलै २०२६ पर्यंत संबंधित पंचायत समिती कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. आबासाहेब अरवत यांनी केले आहे.

योजनेच्या लाभासाठी अर्जदार हा मागासवर्गीय (डउ, डढ, तग-छढ, डइउ, नवबौद्ध) प्रवर्गातील असावा. योजनेसाठी तहसिलदारांचे जात प्रमाणपत्र आणि उत्पन्न प्रमाणपत्र आवश्यक आहे. संगणक योजनेसाठी १२ वी उत्तीर्ण आणि एम.एस. सी.आय.टी. उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.

शिलाई मशीनसाठी संबंधित महिला शिवणकाम करत असल्याचा ग्रामसेवकाचा दाखला आवश्यक आहे. शेतीविषयक योजनांसाठी लाभार्थ्यांकडे स्वतःची शेती असल्याचा पुरावा जोडावा. विद्युत उपकरणांसाठी ग्रामसेवकाचे विद्युत जोडणी प्रमाणपत्र आवश्यक राहील. अधिक माहिती व अर्जाच्या नमुन्यासाठी संबंधित तालुक्यातील पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधावा. असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळिवण्यात आले आहे.

# राज्यातील ८४ हजार आशा स्वयंसेविकांना मिळणार विमा संरक्षण

मुंबई, दि. २७ (प्रतिनिधी) - राज्यातील आरोग्य व्यवस्थेचा कणा असलेल्या हजारो आशा स्वयंसेविका गटप्रवर्तक आणि राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा देण्याची तयारी केली आहे. २१ हजार रुपयांपेक्षा कमी वेतन असलेल्या या सर्व कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सामाजिक सुरक्षा देण्यासाठी 'राज्य कामगार विमा योजना' लागू करण्यात येणार आहे. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव तत्काळ शासनाकडे सादर करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी शुक्रवारी प्रशासनाला दिले. कंत्राटी स्वरूपामुळे नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे वैद्यकीय लाभांपासून वंचित राहणाऱ्या या घटकाला या निर्णयामुळे हक्काचे आरोग्य कवच लाभणार आहे.

मंत्रालयातील आरोग्यमंत्र्यांच्या समिती कक्षात आयोजित करण्यात आलेल्या उच्चस्तरीय बैठकीत याबाबत निर्णय झाला. राज्यात सध्या सुमारे ८४ हजार आशा स्वयंसेविका कार्यरत असून, शासनाच्या विविध आरोग्य योजना तळागाळातील सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचवण्यात त्यांचे योगदान मोलाचे आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका स्पष्ट करताना आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, 'राष्ट्रीय आरोग्य अभियान आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा (१०८ आणि १०२ रुग्णवाहिका) अंतर्गत कार्यरत असलेले कर्मचारी प्रामाणिकपणे सेवा बजावत असतात. मात्र, कंत्राटी नियुक्तीमुळे त्यांना सामाजिक सुरक्षेचे लाभ मिळत नाहीत. त्यांच्यावरील वैद्यकीय खर्चाचा भार कमी करण्यासाठी आणि अपघात, गंभीर आजार किंवा मातृत्वाच्या काळात त्यांना आर्थिक सुरक्षितता प्रदान करण्यासाठी 'ईएसआयसी' योजनेचे संरक्षण देणे आवश्यक आहे.'

या बैठकीला आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन, राज्य कामगार विमा योजनेचे आयुक्त रमेश चव्हाण, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक व आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, अतिरिक्त आयुक्त डॉ. सुनील भोकरे, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड आणि राज्य कामगार विमा योजनेचे संचालक सोहम वायाळ उपस्थित होते.

**रेशन दुकानातील कामगारांनाही विमा संरक्षण**

आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांशिवाय समाजातील इतरही अनेक अल्पउत्पन्न घटकांना राज्य कामगार विमा योजनेचा लाभ देण्याबाबत या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. यामध्ये नागरी सहकारी पतसंस्थांमधील कर्मचारी, रेशन दुकानांमधील कामगार आणि कर्मचारी संघटना, खासगी शैक्षणिक संस्था व शाळांमधील अल्पउत्पन्न कर्मचारी, स्वयंरोजगार संस्था आणि सार्वजनिक वाचनालयांमधील कर्मचारी आदी घटकांचा समावेश आहे.

# स्मृतीशेष नामदेव खरात यांच्या तिसऱ्या स्मृतिदिनी ३०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

## सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणाला दिले प्रोत्साहन; विद्यार्थ्यांना आगळीवेगळी आदरांजली

छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) - समाजासाठी आयुष्यभर कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या स्मृती जतन करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या विचारांचा आणि सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेणे. याच भावनेतून स्मृतीशेष नामदेव दादा खरात यांच्या तिसऱ्या स्मृतिदिनानिमित्त ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, सिडको येथे तब्बल ३०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांना आगळीवेगळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या सामाजिक उपक्रमाचे विविध स्तरातून कौतुक करण्यात आले.




दि. २३ जून २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमात स्मृतीशेष नामदेव दादा खरात यांचे चिरंजीव तथा संपादक गणेश खरात व संपूर्ण खरात परिवाराच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, कंपास बॉक्ससह विविध शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लागावा आणि शिक्षणाविषयी त्यांच्यात प्रेरणा निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्मृतीशेष नामदेव दादा खरात यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर दोन मिनिटे मौन पाळून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या सामाजिक कार्याचा, साध्या जीवनशैलीचा आणि समाजहितासाठी केलेल्या योगदानाचा उपस्थितांनी गौरवपूर्ण शब्दांत उल्लेख केला.

यावेळी भारतीय दलित पँथरचे अध्यक्ष लक्ष्मण दादा भुतकर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत, 'शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन असून प्रत्येक विद्यार्थ्याने मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी जिद्दीने प्रयत्न करावेत,' असे आवाहन केले.

ज्ञान संदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे यांनी अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरणा मिळते, असे सांगत खरात परिवाराच्या कार्याचे कौतुक केले. संस्थेच्या सचिव संगीता खिल्लारे यांनीही समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सर्वांनी सहभागी होण्याची गरज व्यक्त केली.

मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचा योग्य उपयोग करून अभ्यासात प्रगती साधण्याचे आवाहन केले. तसेच स्मृतीशेष नामदेव दादा खरात यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमास भारतीय दलित पँथरचे अध्यक्ष लक्ष्मण दादा भुतकर, ज्ञान संदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे, सचिव संगीता खिल्लारे, मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हर्षल पगारे, सुनील चौधरी, विजय पाटील, साहेबराव शिंदे, वैशाली बागुल, रत्नमाला घोरपडे, सुनीता शेजवळ आणि संजय चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार दैनिक लोकराष्ट्रचे संपादक गणेश खरात यांनी मानले. आपल्या वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला.

स्मृतीदिनानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून खरात परिवाराने केवळ श्रद्धांजली वाहिली नाही, तर शिक्षणाच्या माध्यमातून समाजसेवेचा संदेशही दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान आणि आनंद हेच स्मृतीशेष नामदेव दादा खरात यांना वाहिलेले खरे अभिवादन ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# मुंबई पोलीस अधिकारी संभाजी गुरव यांची मोठी कामगिरी; उत्तर अमेरिकेतील सर्वोच्च डेनाली शिखर सर

मुंबई, दि. २७ (प्रतिनिधी) - मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक संभाजी गुरव यांनी उत्तर अमेरिकेतील सर्वोच्च माउंट डेनाली हे ६,१९० मीटर उंचीचे शिखर यशस्वीपणे सर करून आणखी एक मोठी कामगिरी आपल्या नावावर केली आहे. १७ जून २०२६ रोजी त्यांनी ही मोहीम पूर्ण केली. या यशामुळे जगातील सातही खंडांतील सर्वोच्च शिखरे सर करण्याच्या 'सेव्हन समिट्स' मोहिमेत त्यांनी सहावे शिखर जिंकले आहे.



यापूर्वी संभाजी गुरव यांनी माउंट एव्हरेस्ट, माउंट एल्ब्रस, माउंट किलिमांजारो, माउंट कोसिउस्को आणि माउंट अकॉनकागुआ ही शिखरे सर केली आहेत. आता डेनाली जिंकल्यानंतर त्यांच्या खात्यात सहा सर्वोच्च शिखरांचा समावेश झाला असून, शेवटच्या शिखराची मोहीम बाकी आहे.

गेली १५ वर्षे मुंबई पोलिसात सेवा बजावत असतानाही त्यांनी गिर्यारोहणाची तयारी नियमित सुरू ठेवली. रोज सकाळी ५ ते ७ या वेळेत ते कठोर सराव करत होते. नोकरी आणि गिर्यारोहण या दोन्ही जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे सांभाळल्या.

डेनाली सर करण्यासाठी त्यांनी यापूर्वी २०२३आणि २०२५ मध्ये प्रयत्न केले होते. मात्र खराब हवामानामुळे दोन्ही मोहिमा अपूर्ण राहिल्या. या अनुभवांचा अभ्यास करून त्यांनी २०२६ मध्ये नव्या नियोजनासह पुन्हा मोहीम हाती घेतली.

५ जून २०२६ रोजी तीन सदस्यीय पथकासह त्यांनी मोहिमेला सुरुवात केली. बर्फवृष्टी, अतिशय कमी तापमान, कमी ऑक्सिजन आणि कठीण हवामानाचा सामना करत अखेर १७ जून रोजी सायंकाळी ५ वाजता त्यांनी डेनालीचे शिखर गाठले. शिखरावर भारतीय तिरंगा आणि महाराष्ट्र पोलिसांचा ध्वज फडकवून त्यांनी देशाचा आणि राज्याचा सन्मान वाढवला.

या यशानंतर संभाजी गुरव यांनी त्यांच्या आहार प्रशिक्षक सुजाता गुरव तसेच मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांचे सहकार्याबद्दल आभार मानले. सातत्य, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते, असा संदेश त्यांनी आपल्या यशातून दिला.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# छत्रपती संभाजीनगरात आंतरजिल्हा शस्त्र तस्करीचा पर्दाफाश!

## १० आरोपींना बेड्या, ८ गावठी कट्टे, १४ काडतुसे जप्त!

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात अवैध शस्त्रांची राजरोसपणे तस्करी करून आणि गुंडागर्दीच्या जोरावर गुन्हेगारी वर्चस्व निर्माण करू पाहणाऱ्या एका मोठ्या आंतरजिल्हा टोळीच्या साखळीचा ग्रामीण पोलिसांनी अवघ्या दहा दिवसांत पूर्णपणे पर्दाफाश केला आहे. ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने १३ ते २२ जून २०२६ दरम्यान जिल्ह्यातील विविध भागात टप्प्याटप्प्याने अत्यंत गोपनीय आणि धडाकेबाज कारवाया करत एकूण ८ गावठी कट्टे आणि १४ जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. या आंतरजिल्हा रॅकेटमध्ये थेट सामील असलेल्या १० मुख्य आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून, या कारवाईमुळे मराठवाड्यातील अवैध शस्त्र विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या थेट निर्देशानुसार जिल्ह्यात अवैध शस्त्रे बाळगणारे, त्यांची छुप्या मार्गाने खरेदी-विक्री व आंतरराज्य तस्करी करणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध ही विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सर्वप्रथम बिडकीन परिसरात छापा टाकून गणेश शिवाजी उघडे (रा. मुलानी वाडगाव, ता. पैठण) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक गावठी कट्टा व पाच जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली होती. गणेशची कसून चौकशी केली असता, तो केवळ शस्त्र जप्त करण्यावर न थांबता ग्रामीण पोलिसांना थेट शस्त्र पुरवठा करणाऱ्या मुख्य आंतरजिल्हा डीलरच्या नेटवर्कपर्यंत घेऊन गेला. पोलिसांनी आणखी छापे टाकून तेथून ३ गावठी कट्टे आणि ३ जिवंत काडतुसे जप्त केली. या मुख्य साखळीत गणेश उघडे, अजय उर्फ रोमन शिंदे, राष्ट्रपाल तुपे, आकाश इंगळे, संतोष गायकवाड आणि निशांत पन्हाळे या ६ जणांना अटक करण्यात आली आहे.

याच मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्यात गुन्हे शाखेने गंगापूर परिसरात छापा टाकून किशोर शिवनाथ जाधव याच्याकडून एक गावठी कट्टा आणि जिवंत काडतूस जप्त केले. तसेच बिडकीन पोलिसांनी केलेल्या एका स्वतंत्र कारवाईत आकाश निकम आणि लखन राठोड या दोघांच्या मुसक्या आवळून त्यांच्या ताब्यातून दोन गावठी कट्टे आणि चार जिवंत काडतुसे यशस्वीरीत्या हस्तगत केली. तर अजिंठा पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आलेल्या कारवाईत आबासाहेब मिसाळ या संशयिताकडून एक गावठी कट्टा आणि जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. या अटक करण्यात आलेल्या सर्व १० आरोपींविरुद्ध भारतीय हत्यार कायदा, १९५९ मधील विविध कडक कलमांनुसार गुन्हे नोंदविण्यात आले



आहेत. जिल्ह्यातील या मोठ्या शस्त्र जप्ती मोहिमेबाबत माहिती देताना छत्रपती संभाजीनगरचे ग्रामीण पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी सांगितले की, ''जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणारे, गावठी कट्ट्यांची खरेदी-विक्री करणारे तसेच सोशल मीडिया किंवा इतर माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध यापुढेही अशीच कठोर आणि सातत्यपूर्ण मोहीम सुरू राहील. जिल्ह्यात शांतता राखणे, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे ही जिल्हा पोलिसांची मुख्य प्राथमिकता असून कायदा हातात घेणाऱ्या कोणत्याही गुन्हेगाराची गय केली जाणार नाही.'' ही यशस्वी कामगिरी अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके व त्यांच्या विशेष पोलीस पथकाने चोखपणे बजावली.

## आज शहरात पोलिओ लसीकरण मोहीम; एन-८ रुग्णालयातून होणार शुभारंभ



छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने रविवार, दि. २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. शहरातील शून्य ते पाच वयोगटातील सर्व बालकांना पोलिओचे दोन थेंब देण्याचे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

या मोहिमेचा शुभारंभ उद्या सकाळी ८.०० वाजता मनपा एन-८ रुग्णालयात होणार असून, महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये तसेच इतर सर्व पदाधिकारी आणि मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते बालकांना पोलिओचे दोन थेंब पाजून मोहिमेची सुरुवात करण्यात येणार आहे.

शहरातील सर्व पालकांनी आपल्या पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला जवळच्या पोलिओ लसीकरण केंद्रावर घेऊन जाऊन पोलिओचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. पोलिओमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी प्रत्येक पालकाने या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून बालकांच्या निरोगी भविष्यासाठी सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## आदर्श घोटाळ्याप्रकरणी ठेवीदारांचा १ जुलैला एल्गार

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- आदर्श पतसंस्थेत गोरगरीब, वयोवृद्ध ठेवीदारांच्या ठेवी तीन वर्षांपासून अडकून पडल्या आहेत. या प्रकरणाला गती मिळावी आणि ठेवीदारांना न्याय मिळावा यासाठी १ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोठे आंदोलन करणार असल्याचे एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी शुक्रवारी (दि.२६) सांगितले. यानंतरही कारवाई न झाल्यास थेट मंत्र्यांना घेराव घालण्याचा इशाराही त्यांनी दिला.

आदर्श पतसंस्थेतील ५० हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या ठेवी तीन वर्षांपासून अडकून पडल्या आहेत. त्यामुळे त्रस्त ठेवीदारांसाठी हा लढा अधिक तीव्र करण्याची घोषणा जलील यांनी शुक्रवारी सुभेदारी विश्रामगृह येथे केली. यावेळी ठेवीदारांनी जलील यांना भगवी टोपी आणि भगवी शाल घातली. जलील म्हणाले, या प्रकरणाची सुनावणी फास्टट्रॅक न्यायालयात व्हावी, अशी प्रमुख मागणी सोमवारी करण्यात येणार आहे. संथ गतीमुळे या घोटाळ्यातील ७५ ठेवीदारांचा जीव गेला आहे. यासाठी प्रशासनातील निष्क्रियता जबाबदार असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केल बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमो मोठे आंदोलन करण्यात येईल. त्यानंत जिल्हाधिकाऱ्यांना भेटून तहसीलदारांक प्रलंबित असलेली यासोबतची प्रकरण निकाली काढण्याची मागणी केली जाणा आहे. यावेळी खासदार संजय दिना पाटील यांच्या वक्तव्यावरही टीका करत सर्वांसाठी समान न्यायाची अपेक्षा जलील यांनी व्यक्त केली. हा खासदार कॅमेऱ्यासमोर धमकी देतो. ते सत्तेत असल्याने कुठलीच भीती नाही. त्या खासदारावर कारवाई व्हायला पाहिजे.

## पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करा; आमदार सतीश चव्हाण यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने उद्या (२८ जून) राज्यात शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२६ आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेचा देखील पेपर फुटल्याने उद्या होणारी टीईटी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय आज महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतला आहे. या पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे.

यासंदर्भात आमदार सतीश चव्हाण यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नीट परीक्षेनंतर आता शिक्षक पात्रता परीक्षा देखील पेपरफुटीच्या विळख्यात सापडली आहे. हा केवळ एक पेपर पुढे ढकलण्याचा विषय नाही तर लाखो परीक्षार्थींच्या मेहनतीचा, त्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. या पेपरफुटीमुळे त्यांच्या स्वप्नांवर पाणी फेरले गेले असून महिनोनमहिने अभ्यास करून, नोकरीची स्वप्ने डोळ्यांत साठवून बसलेल्या परीक्षार्थींना मानसिक, आर्थिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. ही अत्यंत संतापजनक बाब आहे.

प्रत्येक वेळी पेपर फुटतोच कसा?, लाखो परीक्षार्थींचा वाया गेलेला वेळ, पैसा आणि मानसिक त्रास याची भरपाई कोण करणार?, त्यांच्या अश्रूंना किंमत आहे की नाही?, प्रामाणिक अभ्यास करणाऱ्या परीक्षार्थींनाच पुन्हा पुन्हा शिक्षा का?, गुन्हा काही मोजके लोक करतात, मग शिक्षा लाखो परीक्षार्थींना का?, पेपर पुढे ढकलला तसं परीक्षार्थींची स्वप्नंही पुढे ढकलली गेली याची जाणीव सरकारला आहे का? असे प्रश्न आता हतबल झालेले परीक्षार्थी, पालक विचारत असल्याचे आमदार सतीश चव्हाण यांनी निवेदनाव्दारे मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

समिती नेमून, चौकशीचे आदेश देऊन परीक्षार्थींच्या जखमा भरून निघणार नाहीत. त्यामुळे शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटीच्या प्रत्येक सूत्रधारावर त्वरीत कठोर कारवाई करून राज्यात पुन्हा कोणाच्याही मनात परीक्षार्थींच्या भविष्याचा सौदा करण्याचा विचारही येऊ नये यासाठी ठोस पावले उचलावीत अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी केली आहे.

## मराठा आरक्षणाची पुढील सुनावणी १० जुलै रोजी होणार!

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- २४ जून २०२६ रोजी मुंबई उच्च न्यायालय मध्ये मराठा एस इ बी सी आरक्षणा विरोधात असलेल्या याचिकावर सर्वोच्च न्यायालयाने नियुक्ती केलेले विशेष न्यायापीठ ज्या मध्ये प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र व्ही.घुगे, न्यायमूर्ती एन. जे. जमादार आणि न्यायमूर्ती संदीप व्ही. मारणे यांचा समावेश आहे.

या न्यायपीठा समोर २४ जून २०२६ रोजी झालेल्या सुनावणी नंतर दिलेल्या न्यायालयीन आदेशात म्हंटले आहे की,प्रतिवादी असलेल्या राज्याच्या वतीने जेष्ठ महाधिवक्ता डॉ. मिलिंद साठ्ये यांनी ३.०० ते ५.००या दुपारच्या वेळेत आपला तोंडी युक्ति वाद सुरू ठेवला. त्यांनी राज्याच्या वतीने नोट -४ बी म्हणजे टीप - ४बी सादर केली या शीर्षकाखालील मुद्दा क्र. ३ बाबतचा आपला युक्तिवाद सादर केला आहे. डॉ.मिलिंद साठ्ये यांनी न्यायालयास कळवले आहे की त्यांना त्यांचे राज्य शासनाच्या वतीने असलेले म्हणणे मांडण्यासाठी आणखी दोन सत्रांची आवश्यकता आहे असे जेष्ठ वकील नानकानी आणि वकील विजय थोरात यांनी नमूद केले की, त्यानंतर त्यांनाही एका सत्राची आवश्यकता असेल. न्यायालयाने पक्षकारांची सोय विचारात घेऊन, ही प्रकरणे १० जुलै २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता सुनावणीसाठी ठेवण्याचे आदेश दिले असुन या मुळे जेष्ठ महाधिवक्ता डॉ.मिलिंद साठ्ये दुसऱ्या सत्रात आपला तोंडी युक्तिवाद पुढे चालू ठेवू शकतील असे आदेश प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रविंद्र घुले,न्यायमूर्ती एन. जे. जमादार आणि न्यायमूर्ती संदीप व्ही. मारणे मारणे यांनी दिले आहेत. या प्रकारणांतील विविध याचिका कर्त्यांच्या वतीने वकील निहार चित्रे, आणि या प्रकारणात प्रतिवादी असलेल्या राज्याच्या वतीने महा धिवक्ता वकील मिलिंद साठ्ये यांच्यासोबत सरकारी वकील नेहा भिडे, अतिरिक्त सरकारी वकील पी. पी. काकडे, बी पॅनेल वकील जय संकलेचा आणि अतिरिक्त सरकारी वकील जी.आर.रघुवंशी जनहित याचीका मध्ये प्रतिवादी असलेल्या राज्याच्या वतीने ज्येष्ठ व विशेष वकील व्ही. ए. थोरात यांच्या सोबत सरकारी वकील नेहा भिडे, अतिरिक्त सरकारी वकील ओ.ए.चांदुरकर, अतिरिक्त सरकारी वकील प्राची तटके आणि अतिरिक्त सरकारी वकील प्रियांका चव्हाण,विभोर हरिष लाद्दाड यांचे जनहीत याचिका मध्ये प्रतिवादी असलेल्या राज्याच्या वतीने महाधिवक्ता वकील मिलिंद साठ्ये यांच्यासोबत बी पॅनेल वकील जय संकलेचा आणि अतिरिक्त सरकारी वकील मोहित जाधव आदी कामकाज पाहत आहेत.

वरील सर्व प्रकरणां मध्ये मराठा समाजाच्या वतीने मुख्य हस्तक्षेप याचीका कर्ता जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे वतीने विधीज्ञ श्रेयश देशपांडे, मधुर अनिल गोलेगावकर आदी कामकाज पाहत आहेत. विशेष म्हणजे या सुनावणी साठी मोजके काही लोकच उपस्थित असतात त्यात प्रामुख्याने अनवानी असलेले आणि मराठा आरक्षण मिळणार नाही तो पर्यंत पायात चप्पल बूट घालणार नाही असे प्रण केलेले मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ते जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील, प्रा अंबादास मोहीते, प्राचार्य तांबे, रामचंद्र शेडगे, संतोष दळवी, सुभाष देसाई, प्रशांत भोसले आदी मराठा क्रांती मोर्चाचे लोक उपस्थित असतात हे विशेष होय.

## तरुणांनो, प्रलोभनांना ठामपणे नाही म्हणा; व्यसनमुक्त समाज ही सर्वांची जबाबदारी-पोलीस उपअधीक्षक साईनाथ ठोंबरे

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- ''महाविद्यालयीन जीवनात मिळणाऱ्या स्वातंत्र्याचा योग्य वापर करत कोणत्याही प्रकारच्या अंमली पदार्थांच्या प्रलोभनांना ठामपणे नाही म्हणायला शिका. व्यसनमुक्त समाजाची उभारणी ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असून सुरक्षित समाज आणि नशामुक्त भारत हेच आपले ध्येय आहे,'' असे प्रतिपादन पोलीस उपअधीक्षक साईनाथ ठोंबरे यांनी केले.

महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, छत्रपती संभाजीनगर कृती विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त विशेष जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठाच्या आर्यभट्ट सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात पोलीस उपअधीक्षक साईनाथ ठोंबरे यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला.

या कार्यक्रमास एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. आर. आर. देशमुख, क्रीडा संचालक नितीन घोरपडे यांच्यासह विद्यापीठाचे प्राध्यापक, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि तरुणांना या धोक्यापासून दूर ठेवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

(पान १ वरून)

### महाराष्ट्र टीईटी परीक्षा पेपरफुटी प्रकरणी...

असून, तो हाती लागल्यानंतर संपूर्ण रॅकेटचा उलगडा होईल, असे पोलिसांनी सांगितले आहे.

याशिवाय आरोपींचे कोचिंग क्लासेस, परीक्षा एजंट किंवा इतर कोणत्याही रॅकेटशी संबंध आहेत का, याचाही तपास सुरू आहे. प्रश्नपत्रिका आणखी कुठे पोहोचली आहे का, किती उमेदवारांपर्यंत ती पोहोचली आणि या कटात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात आहे.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेला भिवंडी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न आरोपींकडे असलेल्या मजकुराशी जुळत असल्याचे प्राथमिक पडताळणीत समोर आले. त्यानंतर परीक्षेची पारदर्शकता कायम राखण्यासाठी २८ जूनची टीईटी परीक्षा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. नीट पेपरफुटी प्रकरणानंतरही परीक्षा सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आता टीईटी पेपरफ ुटीमुळे राज्यातील परीक्षा व्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रकरणामागील संपूर्ण रॅकेट उघडकीस आणण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून, येत्या काही दिवसांत आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### भ्रष्टाचार करता यावा म्हणूनच परीक्षा...

खरंतर भ्रष्टाचार करता यावा म्हणूनच ही व्यवस्था जाणीवपूर्वक सुधारली जात नाही. ही सिस्टीम सुधारूच नये, ही व्यवस्था पारदर्शक होऊच नये, अशीच काहींची मानसिकता आहे, हे माझं ठाम मत आहे,'' असे त्यांनी म्हटले आहे.

शिवसेना ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी देखील या मुद्द्यावरून सरकारला धारेवर धरले आहे. ''नीटचा पेपर फुटला, मागील काही वर्षांत एमपीएससीचा पेपर फुटतो आणि आता टीईटीचा पेपर फुटला! भाजपने संविधान बदलण्यासाठी पक्ष फोडण्यापेक्षा, वारंवार होणारी पेपरफुटी थांबवण्यासाठी लक्ष द्यायला हवे होते. देशाच्या भवितव्याचे हाल करून ठेवले आहेत भाजपने! गेल्या दशकात महाराष्ट्रात अशा घटना वारंवार घडत असून आपल्या राज्याला बदनाम करून ठेवले आहे. दरवर्षी तरुण-तरुणींनी फक्त आंदोलनंच करायची का? आमच्या देशातील तरुणाईने आपल्या भविष्याची स्वप्न कधी पाहायची?,'' असा सवाल उपस्थित करत त्यांनी सरकारवर हल्लाबोल केलाय.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी देखील सरकारवर टीका केलीय. ''नीट पेपरफुटीचे उदाहरण ताजे असताना टीईटीने पेपर फुटू नये यासाठी योग्य खबरदारी घ्यायला हवी होती. पण कुणाला काही पडले आहे का ? जे स्वतःच फोडाफोडीत व्यस्त आहेत, ते पेपरफुटी कशी रोखणार ? टीईटीचा पेपर फुटला म्हणजे हा केवळ एका परीक्षेचा घोटाळा नाही, तर लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर टाकलेला दरोडा आहे. रात्रंदिवस अभ्यास करणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या मेहनतीची किंमत शून्य करणारी ही व्यवस्था नेमकी कोणाच्या संरक्षणाखाली चालते? प्रत्येक वेळी पेपर फुटतो, चौकशीची घोषणा होते, काही जणांना अटक होते आणि काही दिवसांनी सर्व काही शांत होते. पण विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील गेलेले महिने, आर्थिक नुकसान आणि मानसिक त्रास याची भरपाई कोण करणार?,'' असे म्हणत त्यांनी सरकारवर निशाणा साधलाय.

### 'टीईटी' पेपरफुटीवरून तीव्र संताप!,...

दुर्दैवी, संतापजनक आणि राज्याच्या परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना आहे. राज्य शासन आणि शिक्षण विभागाला परीक्षा प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर सुरक्षितता, गोपनीयता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यात गंभीर अपयश आले आहे. राज्य ते राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमधील गैरप्रकारांनी विद्यार्थ्यांचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत केला आहे. प्रत्येक घटनेनंतर चौकशी, कठोर कारवाईची घोषणा करूनही अशा घटना पुन्हा-पुन्हा घडत आहेत. त्यामुळे शासनाची प्रतिबंधात्मक यंत्रणा आणि परीक्षा सुरक्षेची संपूर्ण व्यवस्था प्रभावीपणे कार्यरत नसल्याचे स्पष्ट होते. या प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष आणि कालबद्ध चौकशी करून प्रत्येक दोषीवर कठोर फौजदारी कारवाई करावी. तसेच परिणामकारक आणि दीर्घकालीन उपाययोजना तातडीने अमलात आणाव्यात, अन्यथा विद्यार्थ्यांचा असंतोष अधिक तीव्र होईल,' अशी भूमिका अभाविपचे प्रदेशमंत्री अथर्व कुलकर्णी यांनी मांडली.

### पेपरफुटी सरकारची ओळख...

कारवाई करण्यात आली होती.

परीक्षेदरम्यान गैरप्रकार रोखण्यासाठी यंदा कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित देखरेख, बायोमेट्रिक पडताळणी, फेस स्कॅनिंग आणि मेटल डिटेक्टरचा वापर करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली होती. तरीही पेपरफुटीचा आरोप समोर आल्याने सुरक्षा यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. पारदर्शक कारभाराच्या घोषणा आणि प्रत्यक्षात पेपरफुटीच्या घटना यामधील विसंगती विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण करणारी असल्याचे सपकाळ यांनी म्हटले आहे.

### विलास घुले मृत्यू खून प्रकरणी सौरव....

सर्व प्रश्नांची त्यांनी उत्तरे दिली आहेत, त्यांचा जबाब नोंदवून घेतला आहे. ते आम्हाला तपासात सहकार्य करत आहेत आमचा पुढील तपास सुरु आहे. थार गाडी तिथे गेल्याचे सांगत आहेत. त्या सर्व बाजुने तपास केला जात असल्याची माहिती एसआयटी प्रमुख आयपीएस व्यंकटराम यांनी माध्यमांना दिली.

विलास घुले हत्या प्रकरणात फिर्यादीने नोंदवलेल्या पुरवणी जबाबात खासदार बजरंग सोनवणे यांचे सुपुत्र सौरव सोनवणे यांच्या नावाचा उल्लेख केला आहे. या गंभीर प्रकरणामध्ये सौरव सोनवणे यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करत आंदोलकांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. या पार्श्वभूमीवर, बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावँत यांनी पुरवणी जबाबात नाव आल्यामुळे सत्य शोधण्यासाठी एसआयटीने सौरव सोनवणे यांना चौकशीसाठी पाचारण करण्यात येणार असल्याची माहिती दिली होती. तर, ''पोलीस प्रशासन ज्या ज्या वेळी तपासासाठी बोलावेल, त्या त्या वेळी आम्ही पूर्ण सहकार्य करू,'' अशी भूमिका यापूर्वीच खासदार बजरंग सोनवणे आणि सौरव सोनवणे यांनी माध्यमांसमोर स्पष्ट केली होती. त्यानुसार आज ते स्वतःहून पोलिसांसमोर हजर होत आहेत.

### गद्दारांना जनताच गाडणार;..

खुपसला. गद्दार शिरोमणीने आमदार फोडताना ५० खोके घेतले, मग खासदारांचा भाव काय असेल?, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यावेळी ठाकरेंनी भर मंचावरून संबंधित खासदाराची एक जुनी ऑडिओ क्लिप ऐकवली, ज्यात ते 'आईची शपथ' घेऊन कधीही पक्ष सोडणार नाही असे सांगत होते. ही क्लिप ऐकवत ठाकरे यांनी, आईची खोटी शपथ घेऊन स्वाभिमान विकणाऱ्या गद्दारांना आता सासरी सुखाने नांदू द्या. इकडे ते वाघाचं जीवन जगत होते, तिकडे ओझं वाहणाऱ्या गाढवाचं जीवन जगतील. गद्दार गेले तरी झाडाची मूळ असणारे माझे निष्ठावंत कार्यकर्ते आजही माझ्यासोबत घट्ट उभे आहेत, असे ठाकरे म्हणाले.

अयोध्या राम मंदिराच्या दानपेटीतील पैशांच्या कथित लुटीचा आणि व्हीआयपी दर्शनाच्या नावाखाली सुरू असलेल्या वसुलीचा उल्लेख करत उद्धव ठाकरेंनी देशातील हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून भाजपला घेरले. राम आमचा प्रभू श्रीराम या भोंदू हिंदूंच्या गराड्यात सापडला आहे, त्याला या व्यापाऱ्यांपासून सोडवण्यासाठी शिवसेना लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात 'भाजपमुक्त राम' आंदोलन सुरू करेल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा त्यांनी यवतमाळच्या मातीतून केली. तुम्ही जोपर्यंत माझ्या पाठीशी आहात, तोपर्यंत मी कोणालाही घाबरत नाही. या अन्यायाला तोडून-फोडून टाकल्याशिवाय मी राहणार नाही, अशी ग्वाही देत उद्धव ठाकरेंनी आगामी निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांना आतापासूनच सज्ज होण्याचे आदेश दिले.

खासदार संजय राऊत यांनी आपल्या नेहमीच्या शैलीत संजय देशमुख आणि भाजपवर टोलेबाजी केली. हे बाजार समितीचा प्रांगण आहे, इथे शेतकऱ्यांचा माल विकला जातो. पण १५ दिवसांपूर्वी याच बाजारात एक राजकीय माल ५० कोटींना विकला गेला! शिवसेनेचा भगवा खांद्यावर नसता तर याला बाजारात ५०० रुपयेही कोणी दिले नसते. ज्या मोदींचे बूट चाटायला हे विकासनिधीचे बहाणे करून गेले, ते वाराणसीचा विकास करू शकले नाहीत, हे मतदारसंघाचा काय विकास करणार? हिंमत असेल तर राजीनामा देऊन मशालीच्या चिन्हाशिवाय मैदानात उतरा, असे आव्हान राऊत यांनी दिले.

### महाराष्ट्रात पुढील ४८ तास महत्त्वाचे,...

परिसरात ढगफुटीसदृश पावसाने मोठे संकट आणले आहे. या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांची उभी पिके पाण्याखाली गेली असून, खरीप हंगामासाठी तयार केलेली शेती अक्षरशः वाहून गेली आहे. पावसाअभावी चिंतेत असलेल्या बळीराजावर आता या अतिवृष्टीने दुहेरी संकट ओढवले असून, प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांमधून केली जात आहे.

ठाणे, मुंबई, पुणे, नाशिक, रायगड, रत्नागिरी, अहिल्यानगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

### २० वर्षीय सियाला लग्नासाठी हवी...

मूळचा राजस्थानचा असून या ट्रीपदरम्यानच हे दोघे अधिक जवळ आले. तसंच, चेतन हा सियाच्या कुटुंबासाठी अनोळखीही नव्हता. कारण, चेतन आणि सियाचा भाऊ साहिल हे एकमेकांचे चांगले मित्र होते. साहिलमुळेच चेतन आणि सियाची ओळख झाली. भावासोबत मॅच पाहण्यासाठी गेली असतानाच सियाची चेतनशी पहिल्यांदा भेट झाली आणि नंतर त्यांच्यात पुन्हा संपर्क वाढला, असा पोलिसांचा अंदाज आहे.

या चौकशीदरम्यान पोलिसांनी त्यांचं कॉल रेकॉर्ड्सही तपासलं. जानेवारीपासून या दोघांमध्ये जवळपास २ हजार ४ वेळा फोन कॉल्स झाले. तर, त्या दोघांनी एकमेकांशी २३८ तास संवाद साधला आहे. या संभाषणांची वारंवारता आणि कालावधी हा या कथित कटाचा महत्त्वाचा पुरावा ठरू शकतो, असं अधिकाऱ्यांना वाटत. या प्रकरणातील आणखी एक महत्त्वाचा दुवा सध्या पोलिसांच्या रडारवर आहे. केतनच्या मृत्यूच्या अवघ्या एक दिवस आधी, म्हणजेच १७ जून रोजी सिया आणि चेतन पुण्याच्या लुल्लानगर भागातील एका कॅफेमध्ये भेटले होते. सायंकाळी ४.३० ते ५.३० अशी सुमारे पाऊण तास ही भेट चालली. या भेटीदरम्यानच हत्येच्या अंतिम कटावर चर्चा झाली का, याचा तपास आता पोलीस करत आहेत.